आकर्षक लग्न पत्रिका

उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण

श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्

"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे

मो.94239 28900



# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

मूल्य २.००

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१५६ ■ रविवार १० मार्च २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26



ना नफा! ना तोटा!

पशुखाद्य



गौ माता भोजन ५ कि. गुळ पावडर बॅग 200/- रुपये मात्र

महाशिवरात्रीनिमित्त साबुदाणा ६५ रु.किलो, खजूर ११ रु.किलो

सागर ड्रायफ्रुट

पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००/९६८९०४३५५१)


## सहा कोटी मराठा बांधवांची विराट सभा फडणविसांचे गणित बिघडवणार : जरांगे

**जालना, दि.९- कोट्यवधी मराठे पुन्हा एकदा एकवटणार आहेत. नऊशे एकर जागेवर मराठा समाजाची विराट सभा होईल अशी घोषणा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. कुणबी आरक्षण आणि सगेसोयरे शब्दाच्या अंमलबजावणीसाठी ही विराट सभा घेणार असल्याचे जरांगेंनी जाहीर केले आहे. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टिका केली.**



सहा कोटी मराठा शांततेत एकत्र येणार आहे. सभेची तारीख आणि ठिकाण अजून ठरलेले नाही. मात्र लोकसभा निवडणुकीच्या आधी ही विराट सभा होईल, असे जरांगे पाटलांनी म्हटले आहे. जरांगेंच्या घोषणेनतर विराट सभेसाठी मैदानाची पाहणी सुरु झाली आहे. फडणवीसांची दपशाही, दहशत आणि गुंडगिरी ही सत्तेच्या जोरावर चालली आहे. मैदान भेटल्यावर मी पुढची सर्व माहिती देणार असल्याचे ते म्हणाले. आम्हाला शांत एकत्र येऊन यांचे सगळे बिघडवावे लागणार आहे. आम्ही ७०० एकर जागा पाहिली पण ती आम्हाला कमी पडते. ६ कोटी मराठे एकत्र येणार आहेत. आम्हाला शांततेत एकत्र यावे लागणार आहे. याचे सगळ बिघडवावे लागणार असल्याचे जरांगे यावेळी म्हणाले.

**जरांगे लोकसभा लढवणार?**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील लोकसभा निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. भोकरदन तालुक्यातील आव्हाना येथील सभेत तसे संकेत देण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीत आता मराठा समाजाचे अनेक कार्यकर्ते उमेदवारीसाठी अर्ज करण्याची शक्यता आहे.

मराठ्यांचा लढा राजकारण म्हणून बघू नये. आता मराठा एकत्र आला (पान ८ वर)

## झरदारी पाकिस्तानचे चौदावे राष्ट्रपती

इस्लामाबाद, दि.९- पाकिस्तानमध्ये आज झालेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत आसिफ अली झरदारी विजयी झाले आहेत. झरदारी यांनी इम्रान खान यांच्या उमेदवाराचा २३० मतांनी पराभव केला. झरदारी यांना ४११ मते मिळाली, तर इम्रान खान यांच्या उमेदवाराला केवळ ११८ मते मिळाली. नवाज यांचा पक्ष पीएमएल-एन आणि बिलावलचा पक्ष पीपीपी यांनी मिळून आसिफ अली झरदारी यांना उमेदवारी दिली. २००८ मध्येही ते राष्ट्रपती बनले होते. तर इम्रान समर्थक पक्षाने महमूद खान अचकझाई यांना राष्ट्रपतीपदाचे उमेदवार बनवले होते. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मतदान सुरू असताना झरदारी राष्ट्रपती होणार हे आधीच निश्चित मानले जात होते.

## बचत गटाच्या माध्यमातून आपल्या गावात आपला रोजगार निर्माण करणार : मंत्री डॉ.विजयकुमार गावित

**नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी) - प्रत्येक महिला बचत गटांना आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून दहा हजार रूपये दिले जात आहेत, आता गावातील महिलांनी त्यांचा रोजगार निवडायचा असून त्या रोजगारासाठी बचत गटांना प्रशिक्षण आणि निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, त्यामुळे आपल्या गावात आपला रोजगार निवडण्याचे स्वातंत्र्य आदिवासी महिलांना मिळणार असल्याचे प्रतिपादन डॉ.विजयकुमार गावित यांनी केले आहे.**



तळोदा येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या वतीने आयोजित विविध वैयक्तिक व सामुहिक योजनांच्या लाभा वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ.सुप्रिया गावित, खासदार डॉ. हिना गावित, आदिवासी सेवक डॉ. शशिकांत वाणी, रूपसिंग पाडवी, जितू महाराज, यशवंत ठाकरे,दिलीप ठाकरे यांच्यासह पंचक्रोशीतील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री डॉ. गावित यांनी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून घरकुले, वैयक्तिक व सामुहिक शेळी गट वाटप, महिलांना गायींचे वितरण तसेच गावातील तरूणाईमध्ये खेळ भावना निर्माण व्हावी यासाठी क्रकेट साहित्य व भजनी मंडळांना वाद्यावृंद व (पान ८ वर)

## जैन मंदिराची दानपेटी फोडणाऱ्या तिघांना एलसीबीने ठोकल्या बेड्या; एक लाखांचा मुद्देमाल केला जप्त

**धुळे, दि.९- साक्री तालुक्यातील बळसाणे येथील जैन मंदिरातून अज्ञात व्यक्तींनी दानपेटी फोडल्याची घटना घडली होती. यासंदर्भात निजामपूर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला होता. एलसीबीने विशेष मोहिम राबवून दानपेटी फोडणाऱ्या तिनही आरोपींना जेरबंद केले असून त्यांच्याकडून एकुण एक लाख पाच हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**



बळसाणे गावातील श्री विश्वकल्याणक जैन विमलनाथ तिर्थ भुमी मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी दि.२४ फेब्रुवारी २०२४ रोजी चाळीस हजार रूपये चोरून नेल्याबाबत संजय जयंतीलाल जैन यांनी तक्रार दिली. त्यानुसार निजामपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आली होता. मंदिर चोरीच्या घटनेकडे गांभीर्याने पाहून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांनी गुन्हेगारांचा शोध घेण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. दत्तात्रय शिंदे यांना सुचना केल्या. त्यानुसार पोनि.शिंदे यांनी विशेष मोहिम (पान ८ वर)

## धुळे जिल्ह्यात भारत जोडो न्याय यात्रेच्या अभूतपुर्व स्वागतासाठी जय्यत तयारी सुरु; मविआची बैठक

**धुळे, दि.९- धुळे जिल्ह्यात खा.राहूल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाच्या भारत जोडो न्याय यात्रेचे अभूतपूर्व असे स्वागत करणार असल्याचा निर्धार महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज झालेल्या बैठकीत केला. दरम्यान भारत जोडो न्याय यात्रेच्या स्वागताची जय्यत तयारी सुरु असून जिल्ह्यात ठिकठिकाणी उत्साहपूर्ण वातावरणात खा.राहूल गांधी यांचे स्वागत केले जाणार असल्याचे काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांनी सांगितले. तर धुळे जिल्ह्याचे भारत जोडो न्याय यात्रेचे पडसाद दिल्लीत उमटले पाहिजे त्यासाठी कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना (उबाठा) नेते माजी आ.अशोक धात्रक यांनी बैठकित केले.**



खा.राहूल गांधी यांच्या नेतृत्वाखाली दि.१२ मार्च रोजी भारत जोडो न्याय यात्रेचे धुळे जिल्ह्यात आगमन होत आहे. तर बुधवार दि.१३ मार्च रोजी धुळे शहरात या यात्रेचे आगमन होणार आहे. भारत जोडो न्याय यात्रेच्या स्वागतासाठी व नियोजनासाठी आज शनिवारी सकाळी १० वा. प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि शिवसेना (उबाठा) नेते माजी आ.धात्रक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडी आणि समविचारी पक्ष व संघटनांची बैठक धुळ्यात आयोजित करण्यात आली होती. यावेळी बैठकित भारत जोडो न्याय यात्रेच्या स्वागताबाबत विचारविनिमय करण्यात आला. सोनगीर ता.धुळेपासून तर देवभाने, सरवड, नगाव, नगाव बारी, देवपूर, म.गांधी पुतळा, कराचीवाला खुंट, पाच कंदिल, छ.शिवाजी महाराज पुतळा मनो-हर टॉकीज यांसह विविध चौकात स्वागताची ठिकाणे निश्चित करण्यात आली. या ठिकाणांवर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उबाठा), तसेच इतर समविचारी पक्ष संघटनांचे पदाधिकारी स्वागत करणार आहेत. तर छ.शिवाजी महाराज मनोहर टॉकीजजवळ खा.राहूल गांधी यांच्या चौक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. खा.राहूल गांधी यांचा दोंडाईचापासून ते धुळ्यापर्यंत रोड शो होणार आहे. बैठकित आ.पाटील, माजी आ.धात्रक, काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, माजी आ.प्रा.शरद पाटील, ज्येष्ठ पत्रकर हेमंत मदाणे, डॉ.अनिल भामरे, महेश मिस्तरी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष रणजित भोसले, ज्येष्ठ नेते साबीर खान, हरिश्चंद्र लोंढे, शिवसेनेचे हेमंत साळंखे यांनी नियोजनाबाबत (पान ८ वर)



## एलसीबीने जबरी चोरी करणाऱ्या दोन्ही चोरट्यांना केले गजाआड

**धुळे, दि.९- बडवाणी जिल्ह्यातील सेंधवा तालुक्यातील देवराम तेरसिंग बारेला यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हॉटेल रसराज जवळ दोन अनोळखींनी विमल पुडी मागण्याचे कारण दाखवून खिशातील नऊ हजार नऊशे पन्नास रूपये रोख बळजबरी काढून घेतली.याप्रकरणी देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. यागुन्हयासंदर्भात तपास करून एलसीबीच्या पथकाने दोघांना चोवीस तासांत गजाआड केले असून रोख रक्कम हस्तगत केली आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. दत्तात्रय शिंदे यांना मिळालेल्या माहितीनुसार जबरी चोरीचा गुन्हा राजेश रमेश पाटील रा.शनिमंदिर जवळ,फागणे, ता.जि.धुळे याने व त्याच्या सहकाऱ्याने केला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार फागणे येथून राजेश रमेश पाटील यास ताब्यात घेवून विचारपूसस केली असता त्याने त्याचा साथीदार गोपाल ऊर्फ गोलू रतन पाटील(वय १९) रा.भगवा चौक बाळापूर,ता.जि.धुळे याच्यासह केल्याचे सांगितले. चोरीस (पान ८ वर)

## चौघांनी भर दिवसा शेतकऱ्याला लूटले

नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील नांदरखेडा येथील शेताजवळ एका शेतकऱ्यांस मारहाण करून खिशातील रक्कम व मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेल्याने शहादा तालुक्यातील सारंगखेडा पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदरखेडा ता.शहादा येथील शेताजवळ सात ते आठ मार्च दरम्यान दुपारच्या सुमारास हर्षल रमेश पाटील यांना दोन मोटारसायकल स्वारांनी घेरून मारहाण केली.तसेच त्यांच्या खिशातून एक लाख वीस हजाराची रोकड, मोबाईल असा ऐवज लंपास केला. या प्रकरणी चौघा चोरांच्या विरोधात सारंगखेडा पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आसारामबापूंच्या सुटकेसाठी धुळ्यात संत संस्कृती रक्षा मूकमोर्चाचे आयोजन

**धुळे, दि.९- प.पू.संत श्री आसाराम बापू यांना यथानुकुल आयुर्वेदिक उपचारासाठी शिघ्र पॅरोल अथवा जामीन च्या न्याय मागणीसाठी दि.११ मार्च रोजी सकाळी साडे दहा वाजेच्या सुमारास शहरातून मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.**

जोधपूर कारागृहात प.पू. आसाराम बापू खोट्या आरोपाखाली मागील साडे अकरा वर्षांपासून आहेत. पू.बापूंवर आयुर्वेदिक उपचारासाठी पॅरोल अथवा जामीनसाठी न्यायालयात अनेकवेळा याचिका सादर केल्या न्यायालयाने एक दिवसाचा पॅरोल अथवा जामीन दिला नाही. मानवाधिकार व संविधानिक अधिकाऱ्याच्या दृष्टीने न्याय मागणीला नकार देणे हा पू.बापूंवर अन्याय आहे. यथानुकुल आयुर्वेदिक उपचारासाठी पॅरोल अथवा जामीन मिळावा या मागणीसाठी साधक परिवारातर्फे शहरातून मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. मूक मोर्चा मनोहर टॉकीज समोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा येथून आग्रारोड मार्गे हॉटेल शेर-ए-पंजाब, पाच कंदिल, धुळे शहर पोलीस चौकी, श्रीराम मंदिर धाम, जुनी (पान ८ वर)

## महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास

धुळे, दि.९- नकाणे रोड परिसरातील प्रशांत नगर रूपामाई शाळेजवळून घरकाम करणारी महिला जात असतांना दोन अज्ञात इसमांनी गळ्याची सोन्याची चेन हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.पिडीत महिलेने दि.८ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, रूपामाई शाळेकडून राधेकृष्ण लॉन्स रस्त्याने नर्सरी जवळून दि.१ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास महिला पायी जात असतांना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी आवाज देवून गळयावर थाप मारून चौदा हजार रूपये किंमतीची सोन्याची चेन बळजबरीने हिसकावून नेली. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



## अमळथे गावात अन्नातून विषबाधा पन्नास ते साठ जणांवर उपचार सुरु

**शिंदखेडा, दि.९ (प्रतिनिधी) - तालुक्यातील अमळथेत अंत्ययात्रा झाल्यानंतर बाहेर गावाहून आलेल्या नातेवाईकांसाठी केलेल्या भोजन कार्यक्रमात ५० ते ६० जणांना अन्नातून विषबाधा झाली.**

भोजनानंतर साधारणतः दोन तासानंतर अंत्ययात्रेला उपस्थित असलेल्या लोकांना उलटी, चक्कर यासारखा त्रास जाणवू लागल्याने त्यांना तात्काळ शिंदखेडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ.भूषण काटे व आयुष्य वैद्यकीय अधिकारी डॉ.विनय पवार यांनी तात्काळ उपचार केल्याने पुढील अनर्थ टळला. यामध्ये लहान मुले, स्त्रिया आणि पुरुष या सर्वांचा समावेश आहे. शिंदखेडा ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल असलेल्या ५० ते ६० जणांवर उपचार सुरू आहेत. अमळथे सरपंच मनोहर पवार व गावातील नागरिकांनी त्रास होत असलेल्या रुग्णांना तात्काळ मिळेल त्या वाहनाने शिंदखेडा ग्रामीण रुग्णालयात आणले होते. जेवणानंतर काही लोकांना उलटी, मळमळ, चक्करचा त्रास जाणवू लागला होता.

## आ.पावरा, भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते धनपूर पाड्यात गावठाण फिटर कामाचे भूमिपूजन





**शिरपूर, दि.९- आ.काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते तालुक्यातील धनपूर पाडा येथे नुकतेच गावठाण फिटर या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.**

गेल्या अनेक वर्षापासून या पाड्यावर सिंगल फेज लाईट नसल्याने बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागत होते. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम मंजूर करण्यात आले असून गावकऱ्यांना खूपच आनंद झाला. पारंपरिक आदिवासी ढोल वाजवत व नृत्य करत त्यांचे स्वागत करण्यात आले.यावेळी आमदार काशिराम पावरा म्हणाले, असली, तांडे धनपूर येथील सर्व ग्रामस्थ विकासाला साथ देणारे आहेत. विविध विकासकामे मंजूर करण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयतक्शील असल्याचे सांगितले. भूपेशभाई पटेल यांनी मंजूर कामाचे फायदे सांगताना विजेची बचत कशी करता येईल, तालुक्यातील गावागावांना आदिवासी भागातील गाव पाड्यांच्या (पान ८ वर)



## महापालिकेची एकही जागा भुमाफियांच्या घशात जावू देणार नाही : खा.डॉ.भामरे

**धुळे,दि.९-महापालिकेची जागा भुमाफियांच्या घशा-तून ओढून पुन्हा मनपाच्या ताब्यात देणारे भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचे अभिनंदन. दसेरा मैदानची जागा तत्कालिन भुमिअभिलेख अधिकारी पंकज पवार यांनी भुमाफियांच्या घशात घातली होती. कार्यालयात बोलवून केंद्र शासनाकडे याप्रकरणी सीबीआय चौकशी लावण्याचा दम दिल्यानंतर जागा महापालिकेकडे आली. महापालिकेची एकही जागा भुमाफियांच्या घशात जावू देणार नाही. असा सज्जड दम खा.डॉ.सुभाष भामरे यांनी दसेरा मैदान व्यापारी संकुलाच्या भुमीपूजन सोहळ्या प्रसंगी केले.**

मनपा हद्दीतील आरक्षित भुखंड फायनल प्लॉट क्र. १५३ येथे नियोजित दसेरा मैदान व्यापारी संकूलाच्या भुमीपूजन सोहळ्या प्रसंगी खा.डॉ. सुभाष भामरे बोलत होते. यावेळी माजी आ.राजवर्धन कदमबांडे, गजेंद्र अंपळकर, मनपा प्रशासक तथा आयुक्त अमिता दगडे-पाटील, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव, प्रतिभा चौधरी, माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर, माजी नगरसेवक हिरामण गवळी, अमोल मासुळे, योगीता पवार, ओम प्रकाश खंडेलवाल, हेमंत मराठे, अभियंता कैलास शिंदे, संजय शर्मा यांच्यासह (पान ८ वर)


दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -60,100 रु.+3% GST

सोने- 24 K -65,500 रु.+3% GST

चांदी- 74,500 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३


## तोरणमाळ येथे महाशिवरात्री निमित्त लोटला जनसागर दर्शनासाठी भाविकांच्या रांगा; भक्तिमय वातावरण

**शहादा, दि.९ (गिरिधर मोरे)- महाराष्ट्रातील २ नंबरचे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असलेले सातपुड्याच्या चौथ्या रांगेतील तोरणमाळ (ता. अक्राणी) येथे महाशिवरात्री निमित्ताने गुरुगोरक्षनाथ मंदिरावर भाविकांचा दर्शनासाठी रांगाचरांगा लागल्या होत्या. सर्वत्र भक्तीमय वातावरणाने परिसर गजबजून गेला होता.**



तोरणमाळ येथे भगवान गोरक्षनाथांचा यात्रोत्सवात मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात राज्यातील हजारो भाविक दर्शनासाठी आले होते. मध्य प्रदेशातील नेमाळ भागातील भक्तगण मोठ्या संख्येने रात्री मुक्कामी राहून जागरण करत नैवद्य तयार करतात. विशेषतः नेमाळी बांधव व आदिवासी बांधव यांचा एकरंगी पेहराव यात्रेत आकर्षक ठरत होते. गुरु गोरक्षनाथ यांची पालखी मंदिरापासून गावात ढोल ताश्याचा गजरात काढण्यात आली होती. यावेळी सर्वांचे लक्ष वेधले गेले होते. यावेळी ग्रामस्थानी सहभाग नोंदविला होता. म्हसावद पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी राजन मोरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे, पोलीस उपनिरीक्षक भूनेश मराठे, राहुल पाटील यांच्या सह दंगा नियत्रण कक्षाचे पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. यावेळी वनक्षेत्रपाल एम.बी.चव्हाण, वनपाल संजय पवार, डी. एन.सोनवणे, वनरक्षक संतोष चौधरी, ग्रामीण रूग्णालयाचे डॉ. सुहास पाटील, झापी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.दिनेश रावत-ळे, सरपंच रमेश चौधरी, रविंद्र चौधरी, सामाजिक कार्यकर्ते जिवन रावताळे ग्रामसेवक डी डी पाटील उपस्थित होते.

गोरक्षनाथ मंदिराच्या परिसरात भाविक आपल्या श्रद्धेने यशवंत तलाव व मंदिरला (पान ८ वर)

## झाडाची फांदी कापल्याने चाकू हल्ला; गुन्हा दाखल

धुळे, दि.९- देवपूर नकाणे रोड परिसरातील मधुमंदर पोलीस सोसायटी येथे घरासमोरील झाडाची फांदी तोडल्याचा राग आल्याने कुणाल पाटील याने चाकुने हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे.मनोहर मधुकर पाटील यांनी दि.८ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, मधुमंदर सोसायटी येथे घरासमोरील झाडाची फांदी तोडल्याचा राग आल्याने एका महिलेसह राज पाटील व कुणाल पाटील या शिवीगाळ केली. कुणाल पाटील याने घरातील चाकु आणून मनोहर पाटील यांच्यावर हल्ला केला. त्यात त्यांच्या डव्या हाताच्या दोन बोटांना दुखापत झाली आहे. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


सायली परांजपे लिखीत

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ





* शुभहस्ते *
प्रा.डॉ.शरद बाविस्कर
CFFS फ्रेंच तत्वज्ञान, जेएनयू, दिल्ली

* अध्यक्ष *
मा.इंदुमती जोंधळे
ज्येष्ठ लेखिका, पुणे

* प्रमुख उपस्थिती *
प्राजक्ता हनमघर
संवेदनशील अभिनेत्री

सायली परांजपे
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तकाच्या लेखिका

* आयोजक *
यंग फाऊंडेशन, धुळे

* प्रकाशन समारंभ *
वेळ : रविवार, १० मार्च २०२४ सायंकाळी ५.०० वाजता

* स्थळ *
दाते रिजेन्सी, रेल्वे क्रॉसिंग जवळ, मालेगावरोड, धुळे

टीप : कार्यक्रमाच्या ठिकाणी पुस्तकाच्या प्रती सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध असतील.




# बहर

अंतरंग....

४ दोन अक्षरी मंत्र !

५ जीएसटी नोंदणी करणे कोणाला आवश्यक आहे?

६ जॉब की ड्युटी..!!




# सुटलेली गणितं : विनम्र प्रेरणादायी आत्मकथन

प्राचार्य डॉ.कृष्णा पोतदार, मो.९४२२८ ९५४६५

सुटलेली गणितं हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य डॉ. के. बी. पाटील सरांचे अत्यंत विनम्र भाषेत लिहिलेले परंतु सर्वांना प्रेरणा देणारे आत्मकथन आहे. या आत्मकथनात त्यांनी त्यांच्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे लेखनरूपाने दर्शन घडवले आहे. आपलं आयुष्य आणि त्याच्या आत दडलेल्या अजीबोगरीब घटना कुणाला तरी सांगितल्या पाहिजेत, त्या जवळच्या सर्वांना कळल्या पाहिजेत ही मानवी नैसर्गिक प्रवृत्ती आहे. आत्मकथनात आपल्या भावभावनांचा आत्मविष्कार होत असतो. या भावभावनांच्या प्रसंगांची योग्य निवड करणे आवश्यक असते. कारण हे अनुभव, ह्या भावभावना वाचणाऱ्याला प्रेरणा देणाऱ्या असतात. सुटलेली गणितं या आत्मकथनाच्या लेखकाने ह्या सर्व गोष्टींचे भान अगदी पुरे पूर पाळलेले आहे. आपल्या जीवनातील ज्याही घटना त्यांनी निवडल्या आहेत त्या सर्वांना प्रेरणा देणाऱ्या तर आहेतच, परंतु विचार करायला प्रवृत्त करणाऱ्याही आहेत. खरं म्हणजे या आत्मकथनाच्या लेखकाला हे आत्मकथन लिहायचे नव्हते. तसा विचार त्यांच्या गावीही नव्हता परंतु आप्त-मित्रांनी हे लिहून काढायची गळ घातली. यावर लेखकाने अत्यंत प्रांजळपणे आपलं मत नोंदवतांना लिहिले आहे- ....स्वतःविषयी बोलणं, लिहिणं हे मी कटाक्षाने टाळत आलोय. म्हणजे ते मला नेहमीच कठीण वाटलंय. त्याबरोबरच मला असंही वाटतं की आपलं आयुष्य खूप साधं सरळ आहे. आपण केला तसा संघर्ष इथे बहुतेकांच्या वाट्याला येतो. मग कशाला लिहा! असं असलं तरी आप्त-मित्रांच्या आग्रह याबाबत कधीच कमी झाला नाही. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणून आज हे आत्मकथन आपल्या हाती आहे.

प्रा.के.बी. पाटील हे सर्वदूर केबीअण्णा या नावाने सर्वपरिचित आहेत. माझे मोठे बंधू हे केबीअण्णां बरोबर बी. एस्सी गणित विषयात पुढे मागे सहयोगी होते. त्यांच्या तोंडून नेहमीच अण्णांच्या स्वभावाची, हुशारीची कथा ऐकायला मिळत असे.




त्यामुळे केबीअण्णा बद्दलचं एक कुतूहल माझ्या मनात नेहमीच असे. सुटलेली गणितं हे आत्मकथन हाती पडलं आणि सर्व प्रकारची कुतूहलं दूर झालीत. जळगाव जिल्ह्यातील चिंचपूरे गावापासून ते उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू पदापर्यंतचा संघर्ष लक्षात आला. असं म्हणतात की कुठल्याही उच्चपदस्थ व्यक्तीचा जीवन प्रवास हा त्याच्या बालपणाच्या संस्कारात दडलेला असतो. केबीअण्णांवरील संस्कारात यांचे जन्मगाव चिंचपुरे आणि माध्यमिक शिक्षण जेथे झाले ते पिंपळगाव (हरेश्वर) या गावांचा मोठा वाटा आहे. चौदा-पंधरा जणांच्या मोठ्या खटल्याच्या कुटुंबात जन्मलेले अण्णा या परिवारातील प्रत्येक व्यक्तीपासून काही ना काही संस्कार घेत राहिलेत. ह्या सर्वांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलचं लेखकाने केलेलं वर्णन हे अत्यंत रसभरीत आहे. ते जाणून घेण्यासाठी मुळातूनच हे आत्मकथन वाचायला हवं. चिंचपुरे आणि पिंपळगाव (हरेश्वर) ही गावे मुळातच सत्यशोधकी विचारांची होती. अण्णांचे वडील हे सत्यशोधकी विचारांचे होते. गावातील अयोग्य प्रथा-परंपरा त्यांनी बंद केल्या होत्या. गावात सवर्ण आणि दलित असा भेदा-भेद मानला जात नव्हता. गावातील मुस्लिम माणसांचा धर्म नव्हता तर मुस्लिम ही जात मानली जात होती. गावामध्ये जे कीर्तनकार प्रारंभी यायचे ते सर्व पुरोगामी विचारांचे असत. संपूर्ण गावात दारूबंदी होती. या सर्व गोष्टींचे संस्कार लहानग्या अण्णांवर पडला नसता तर नवलच घडले असते. त्यात राष्ट्र सेवा दलाची शाखा गावात असल्यामुळे खूप मोठा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्याकाळी पूज्य साने गुरुजींच्या विचारांचा आणि कार्याचा प्रचंड प्रभाव खानदेशात पडलेला होता. राष्ट्र सेवा दलाच्या विचारांमुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता व धर्मनिरपेक्षता या नैतिक मूल्यांचा परिणामकारी प्रभाव अण्णांच्या व्यक्तिमत्त्वावर दिसून येतो. एवढंच नाही तर काही काळ ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेतही गेलेत; तेथल्या विचारांचा प्रभाव ही त्यांच्यावर होता. दोन्ही गावांच्या संस्काराने केबीअण्णांच्या व्यक्तित्त्वाचा कायापालट झाला. कुलगुरूपदापर्यंतचा प्रवासात गावच्या संस्कारांचं मोल अनमोल आहे.

उच्च शिक्षणासाठीचा संघर्ष हा केबीअण्णाच्या आयुष्यातील दुसरा महत्त्वाचा टप्पा आहे. महादू दोधू पाटील या गणितप्रेमी मुख्याध्यापकांच्या आग्रहानुसार केबीअण्णांनी धुळ्याच्या श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या पदवीपूर्व विज्ञान वर्गात प्रवेश घेतला. एसएससीला जामनेर केंद्रात प्रथम आल्यामुळे गुणवत्ता शिष्यवृत्ती त्यांना प्राप्त झाली होती. या शिष्यवृत्तीच्या बळावरच पुढले उच्च शिक्षण घ्यायचे होते. केबीअण्णांच्या उच्च शिक्षणासाठी कुटुंबीय पैशांची व्यवस्था करू शकत नव्हते. शिष्यवृत्तीच्या अल्प पैशात वसतिगृह, मेस आदींचा खर्च भागवून त्यांनी अभ्यासात लक्ष केंद्रित करीत प्रथम श्रेणीतील उच्च यश प्राप्त केले. त्यामुळे पुणे विद्यापीठात इंजीनियरिंग साठी ते पात्र ठरलेत. तेथे त्यांनी प्रवेशही घेतला परंतु मेस व वसतीगृहाचे शुल्क आधी भरावयाचे होते आणि ते शक्य नसल्यामुळे त्यांनी धुळ्याला परत येऊन बी. एस्सी गणित मुख्य विषयासाठी प्रवेश घेतला. प्रा. सरदेसाई सारख्या शिक्षकांचा त्यांना वरदहस्त लाभला. गणितात बी. एस्सीला ते पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आलेत. पुणे विद्यापीठात एम. एस्सी साठी प्रवेश घेतला. तेथें प्रा. हुजूरबाजार सारख्या गणितातील ख्यातनाम, निष्णात अशा प्राध्यापकांचा परिसस्पर्श लाभला. केबीअण्णा एम. एस्सीतही सर्वप्रथम आलेत. धुळ्याच्या एस.एस.व्ही.पी.एस विज्ञान महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून रुजू झालेत. त्यांनी गणित विषयात पीएच.डी करावी असा आग्रह त्यांचे गुरुजन व स्नेही करू लागले. त्याप्रमाणे त्यांनी कॅनडातील ओटावा विद्यापीठाचा फॉर्महीी भरला. याचदरम्यान परिवाराच्या आग्रहाखातर त्यांनी विवाहही केला. ओटावा विद्यापीठात प्रवेशासाठी भरलेला अर्ज मंजूर होऊन त्यांना असिस्टंटशिप मंजुरीचे पत्र आले. विदेशातून उच्चशिक्षण घेऊन आलेले डॉ. भदाणे, डॉ. देशपांडे आणि प्राचार्य एन . के. अण्णांनी त्यांना प्रोत्साहित करून ही संधी न सोडण्याचा सल्ला दिला. अनेक आर्थिक, प्रशासकीय अडचणींवर मात करून केबीअण्णा कॅनडात पोहचले. कॅनडात संख्याशास्त्राचे प्राध्यापक असलेले डॉ. जगन्नाथ वाणीसारखे मसीहा भेटलेत. सर्व प्रकारच्या मदतीसाठी त्यांनी केबीअण्णांना आश्वस्त केले. डॉ. रशीन सारखे पीएच.डी साठी सहाय्यक प्राप्त झालेत. कॅलगरी विद्यापीठात पीएच.डी साठी प्रवेश व टीचिंग असिस्टंटशिप मंजूर झाल्यामुळे कॅलगरीला जाण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला. डॉ. वरदराजन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी चा अभ्यास सुरू झाला. डॉ. वरदराजन गणितातील युरोप खंडातील सर्वश्रेष्ठ प्राध्यापक होते. केबीअण्णांसमोर आर्थिक अडचणींसह अनेक अडचणींचा डोंगर उभा असायचा. परंतु वेळोवेळी कुणीतरी मदतीला धावून येऊन त्या दूर होत होत्या. अत्यंत परिश्रमाने पीएच.डी प्राप्त केल्यानंतर त्यांनी पुन्हा भारतात येण्याचा निर्णय घेतला.

भारतात आल्यावर एस.एस.व्ही.पी.एस्, लासलगाव महाविद्यालय, मु. जे. विद्यालय जळगाव असा प्रवास करीत धुळ्याच्या जयहिंद महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी केबीअण्णा स्थिरावलेत. जयहिंद महाविद्यालयात अनेक सुधारणा करीत प्राध्यापकांची एक भरभक्कम फळी त्यांनी उभारली. फोर्ड फाउंडेशनकडून जवळपास सहा वर्ष परिसर विविधता प्रकल्प राबवविला. यात जवळच्या परिसरातील महाविद्यालयांचाही समावेश होता. अनेक विद्यार्थी उपयोगी उपक्रमांची रेलचेल होती. या उपक्रमांनी महाविद्यालयाचे स्वरूपच बदलून टाकलं. सर्वत्र एक चैतन्याचं, नावीन्यांच वातावरण पसरविण्यात केबीअण्णा यशस्वी झालेत. या उपक्रमात स्त्रीचं अस्तित्व व ओळख, धार्मिक सहभाग, भाषिक व सामाजिक विविधता, विज्ञान व संस्कृती अशा विविधांगी उपक्रमांसाठी तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा आयोजित केल्या गेल्या. आदिवासी महिलांच्या आरोग्य प्रकल्पाला कॅनडा इंटरनॅशनल डेव्हलपमेंट एजन्सी (सोडा)ला पाठवून सत्तर लाखांचे अनुदान प्राप्त केले. ज्यात ३०० आदिवासी पाडय़ांवरील सुईणींना प्रशिक्षण दिलं गेलं. असे अनेक उपक्रम राबवीत असताना २०००-२००१ मध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव म्हणूनही त्यांनी काम केले. याशिवाय जयहिंद मध्ये अनेक आव्हानात्मक गोष्टींना खंबीरपणे तोंड दिले. निर्भीडपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वपूर्ण पैलू आहे. जयहिंदमध्ये फुलपाखरू प्रकरण, विद्यापीठात एका संस्थाचालकाने घातलेला धुमाकूळ या प्रकरणांना ते घाबरले नाहीत. लोकमान्य टिळकांसारखा करारी बाणा दाखवत- मी काही चुकीचे केले नाही, मी माघार घेणार नाही म्हणत अत्यंत धैर्याने त्यांचा सामना केला.

विद्यापीठात कुलगुरूपदी निवड झाल्यानंतर त्यांनी अनेक नवनवीन उपक्रम राबविलेत. महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, साने गुरुजी अभ्यास मंडळ यासारखे अनेक उपक्रम, चर्चासत्रे, व्याख्यानमाला त्यांनी सुरू केल्या. आपला अनेक वर्षांचा प्रशासनाच्या अनुभवाचा पुरेपूर लाभ करून आपले उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ शैक्षणिक जगतात व संशोधनाच्या क्षेत्रात कसे अग्रभागी राहील याचाच सतत ध्यास घेतला. विद्यापीठाची परीक्षा पद्धती निर्दोष बनवण्यासाठी खूप मेहनत घेतली. अंध-अपंग मुलांना शिक्षण सुलभ होईल यासाठी छोटी छोटी केंद्रे निर्माण करण्यात पुढाकार घेतला. हे सर्व करत असताना आपल्या विद्यापीठातील विद्यार्थी हा जबाबदार, जाणीव असलेला संवेदनशील मनुष्य म्हणून बाह्य जगतात कसा वागेल यावर लक्ष केंद्रित केले.

केबीअण्णांचा खेड्यातून सुरू झालेला प्रवास ते कुलगुरूपदापर्यंतचा काळ हा या आत्मकथनात चित्रित झाला आहे. हा सर्व भाग लिहितांना त्यांनी अत्यंत साध्या, सोप्या सरळ भाषेत वाचकांच्या हाती दिला आहे. हे सर्व लिहितांना कुठेही मीचा स्पर्श झालेला नाही. जे काही सांगायचे ते अत्यंत प्रामाणिक आणि प्रांजळपणाने त्यांनी नमूद केले आहे. पदोपदी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला विनम्र भाव दिसून येतो. या आत्मकथनापासून सर्वच संघर्षकर्मींना प्रेरणा प्राप्त होणार आहे यात शंका नाही.

**सुटलेली गणितं**
**प्राचार्य के. बी. पाटील**
**आर्ष पब्लिकेशन्स, कोथरूड, पुणे ३८.**
**प्रथमावृत्ती. पृष्ठे - १६०**
**मूल्य - . ३००/-**

# स्त्री काल, आज, उद्या

प्रा.सुनंदा माधवराव वैद्य, मो.९८२३१२६०२४

स्त्री काल, आज ,उद्या या विषयाचा विचार करताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते. ती म्हणजे स्त्री ही कोणीतरी वेगळी आहे. ती पुरुष नाही म्हणजे माणूस नाही. खरं तर माणूस या शब्दातच स्त्री व पुरुष या दोघांचाही समावेश आहे. पण कधी कधी स्त्री साठी बाई माणूस असा शब्द वापरला जातो. स्त्रीला अजूनही दुय्यम स्थान दिले जाते. म्हणून तर स्त्रीचा वेगळा विचार कालौघाच्या दृष्टीकोनातून करण्याची वेळ आली आहे. खरं पाहिलं तर स्त्री आणि पुरुष हे फक्त नैसर्गिक दृष्टीकोनातून भिन्न आहेत. पण बुद्धिमत्ता , गुणवत्ता व कला कौशल्ये या गोष्टी पुरुषाप्रमाणेच स्त्री मध्येही आहेत. हे आता सिद्ध झालेले आहे.

कालच्या स्त्रीचे वर्णन करताना नेहमीच चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र असणारी हे शब्द वापरले जातात. खरं तर पुरुष प्रधान समाजानेच तिला कौटुंबिक व धार्मिक जबाबदा-यांमध्ये अडकवून ठेवले. तिला ना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, ना पैसे मिळवण्याचे वा मनाप्रमाणे पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य, ना घराचा उंबरठा ओलांडून बाहेर जाण्याचे स्वातंत्र्य! तिला कायम पुरुषांच्या वर अवलंबून ठेवण्यात आले. शिवाय तिच्या घरातल्या कष्टांनाही मर्यादा नव्हती. तिची इच्छा, तिची सोय, तिच्या भावना, तिचे मन यांचा विचारच कधी केला गेला नाही. त्यामुळे ती दिवसेंदिवस अधिकाधिक सोशीक व सहनशील होत गेली. पुरुषांची गुलामी हेच तिचे आयुष्य होते. कुटुंबात व समाजात तिचे स्थान नगण्यच होते . घराण्याचा वंश वाढवणारी म्हणूनच तिच्याकडे पाहिले गेले. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव! स्त्री मध्ये शिकण्याची क्षमता असूनही तिला शिक्षणापासून मुद्दामच वंचित ठेवण्यात आले.

वरील पार्श्वभूमीवर आजच्या स्त्रीचा विचार केल्यास आजची स्त्री ही सुसंस्कारी, सुशिक्षित व नोकरी करणारी आहे. आपली बुद्धिमत्ता व गुणवत्ता स्त्रीने आपल्या शिक्षणातून व नोकरी करण्यातून सिद्ध करून दाखवली आहे.

शिक्षणाचे महत्त्व आजच्या स्त्रीला समजलेले आहे. शिक्षण नावाचा परीस तिला सापडला आणि त्याचा मोठाच प्रभाव तिच्यावर पडला. शिक्षणामुळे तिचे विश्व विशाल झाले. अनेक गोष्टी तिला समजू लागल्या. ती सखोल विचार करू लागली. म्हणूनच कुटुंबातील सर्व सदस्यांनी शिकावे यासाठी ती धडपड करू लागली. विशेषतः मुलांचे शिक्षण व मुलांवर करावयाचे घरचे संस्कार या बाबतीत ती अतिशय दक्ष राहू लागली. शिक्षणामुळे ती संसाराला हातभार लावण्यासाठी नोकरी करून अर्थार्जन करू लागली. त्यामुळे तिच्या कुटुंबाचे राहणीमान उंचावण्यास मदत झाली. स्वतः च्या पायावर उभी राहिल्यामुळे तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. मुलांचा शाळा व महाविद्यालय यातील प्रवेश, पोस्ट, बँक, घरात लागणा-या सर्व आवश्यक वस्तुंची खरेदी अशा सगळ्या गोष्टी तिचे बौद्धिक ज्ञान व अनुभवातून मिळालेले ज्ञान यांची योग्य सांगड घालून ती यशस्वीपणे हाताळू लागली. संसारात यांत्रिक उपकरणे वापरून स्वयंपाक व इतर कामे यातून कष्टाची व वेळेची बचत करु लागली. नोकरीच्या ठिकाणी सुद्धा मन लावून काम करून ती प्रगतीपथावर राहू लागली. नोकरी करूनही घरातील सणवार,परंपरा व धार्मिक कार्यक्रम जमेल तसे जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न ती करु लागली. या सगळ्या गोष्टींचा परिणाम म्हणजे तिला आत्मभान येऊन तिचा आत्मविश्वास वाढला. आपले हक्क व अधिकार यांची जाणीव तिला झाली. कुटुंबातील सदस्य खंबीरपणे पाठीशी असतील तर स्त्री कोणत्याही क्षेत्रात अगदी वरिष्ठ पदावरसुद्धा आत्मविश्वासपूर्वक व जबाबदारीने काम करु शकते हे मेधाताई पाटकर, किरण बेदी, लता मंगेशकर, सुनिता विल्यम्स, नीला सत्यनारायण, सुधा कृष्णमूर्ती, इंदिरा गांधी, विजया मेहता, नीलम गो-हे, नीलिमा मिश्रा अशा कितीतरी स्त्रियांनी सिद्ध केले आहे. पण खंत एवढीच आहे की अशा स्त्रियांचे प्रमाण एकूण स्त्रियांच्या संख्येच्या तुलनेत अद्याप बरेच कमी आहे. ते वाढण्याची आवश्यकता आहे.

शिक्षणामुळे शहरी स्त्रियांची प्रगती झाली असली तरी ग्रामीण स्त्री मात्र शिक्षणाचा परीस तिच्यापर्यंत न पोचल्या मुळे अशिक्षित, गरीब व अति कष्टाळू अशीच राहिली आहे. कुटुंबाला हातभार लावण्यासाठी ती ही अर्थार्जन करते. त्यासाठी बाहेर जाण्याचे स्वातंत्र्य तिला आहे. पण तिने कष्टाने मिळवलेला पैसा घरातील व्यसनी पुरुष हिसकावून घेतात. त्यामुळे तिचे कष्ट व गरिबी संपतच नाही. खेड्यातील मुलींचे शिकण्याचे प्रमाण सध्या तरी कमी आहे. पण आता सरकारी योजनांद्वारे मिळणा-या सवलतींमुळे हे प्रमाण वाढू शकेल असे वाटते.

स्त्री साक्षर असो निरक्षर, शहरी असो वा ग्रामीण, विवाहित असो वा अविवाहित, तरूण असो वा वृद्ध तिच्यावर होणारे हुंडाबळी, बलात्कार, स्त्री भ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसाचार असे सर्व प्रकारचे अत्याचार मात्र आजही सुरूच आहेत. शासन स्तरावर व स्थानिक सामाजिक संघटनांद्वारा स्त्रियांना आज अनेक प्रकारची मदत व मार्गदर्शन उपलब्ध आहे. तसेच स्त्रियांच्या बाजूने अनेक कायदे झाले आहेत. जागरूक होऊन काही स्त्रिया त्याचा फायदा घेत आहेत.

एकूण कालच्या स्त्री पेक्षा आजची स्त्री बरीच पुढे गेली आहे. पण उद्याच्या स्त्रीला या पेक्षाही पुढे जायचे आहे/जावे लागणार आहे. संपूर्ण समाजाला मार्गदर्शक ठरेल अशा विचारांची पेरणी स्त्रीयांनी केली नि ती समाजाने मान्य केली असा अनुभव आजवर आलेला नाही. परंतु आता तसे होण्याची वेळ आलेली आहे. आचार्य विनोबा भावे यांच्या या विधानातून उद्या ची स्त्री कशी असेल याचे चित्र स्पष्ट होते.

स्त्रीची ओळख समाजात एक माणूस म्हणून, एक व्यक्ती म्हणून असेल/ असायला हवी, केवळ एक स्त्री म्हणून नसेल. उद्याच्या प्रत्येक स्त्रीची हीच इच्छा व अपेक्षा असेल. लिंगभेद तिला मान्य असणार नाही. कारण अनेक नवनव्या कार्यक्षेत्रात ती पुरुषाच्याही पुढे जाऊन आपली त्या त्या क्षेत्रातील कार्यक्षमता सिद्ध करणार आहे.

उद्या स्त्रियांच्या हाताखाली पुरुष काम करताना दिसतील व त्यात विशेष असे काही न वाटता तो वास्तवाचा एक भाग असेल. स्त्रियांमध्ये नैतिकतेची पातळी उच्च असल्यामुळे त्यांच्या कारभारात ही त्याचे प्रतिबिंब उमटेल. त्यांचा कारभार पारदर्शी असेल त्यामुळे त्याचे सकारात्मक परिणाम होतील.

उद्याच्या स्त्रीला आजच्या पेक्षाही कठीण अशी नवनवीन आव्हाने स्वीकारावी व पेलावी लागतील. ती त्यात नक्की च यशस्वी होईल कारण त्यासाठी लागणारी आवश्यक ती बुद्धिमत्ता व गुणवत्ता तिच्याकडे असेल.

उद्याच्या स्त्रीला समूह जीवना कडून व्यक्ती जीवनाकडे/ स्वतः कडे प्रवास करावा लागणार आहे. स्वतःची अस्मिता घडवायला स्वतः ची ओळख स्वतः लाच करवून घेण्यासाठी अवकाश मिळण्याची आवश्यकता भासेल. चिकित्सकपणे आजूबाजूला बघून चांगले ते घेऊन व नको ते टाळून नव्या सुधारित संस्था व जाति निर्माण करण्यासाठी तिची उद्याची वाटचाल असेल.

स्त्रीला लोकशाहीची सुरूवात लोकशाहीचं सर्वात छोटं रूप म्हणून कुटुंबापासून करायची आहे.आजच्या स्त्रीने राजकारणात प्रवेश केलेला आहे. आरक्षणामुळे तिला ही संधी मिळाली आहे. पण राजकारणा तले स्त्रियांचे प्रमाण अजून फारसे वाढलेले नाही. उद्या मात्र हे चित्र बदलेल कारण आपले प्रश्न सोडवण्यासाठी व आपले हक्क मिळवण्यासाठी आपणच राजकारणात उतरणे आवश्यक आहे याची जाणीव अधिक स्त्रियांना झालेली असेल. तसेच आजच्या प्रमाणे केवळ नामधारी न राहता उद्याची स्त्री स्वयं निर्णय घेणारी, प्रत्येक योजना यशस्वीपणे राबवणारी व इतरांना प्रेरक आणि मार्गदर्शक ठरेल अशी असेल. स्त्रीविषयक प्रश्नांबाबत ती अधिक जागरूक असेल व सर्वांना सुखी, सुंदर व सुरक्षित जीवन जगता यावे म्हणून मिळालेल्या शिक्षणाचा आपल्या अंगच्या गुणकौशल्यांच्या साह्याने योग्य तो उपयोग सन्मा र्गाने व योग्य ती संधी येताच यशस्वीपणे करून जीवनातले प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी उद्याची स्त्री प्रामाणिकपणे प्रयत्न करणारी असेल.

एकूण काय तर आवश्यक ते शिक्षण, योग्य ते प्रशिक्षण व सामाजिक संरक्षण यांच्या बळावर सक्षम झालेली उद्याची स्त्री निर्णय प्रक्रिया व विकास कामे अमलात आणण्यासाठीची प्रक्रिया यात प्रत्यक्ष सहभागी असेल.स्त्रियांचं हे नव रूप दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती या तिन्ही रुपांच्या पुढे जाऊन मुंगी उडाली आकाशी तिने गिळिले सूर्यासी असं सर्वव्यापक झालेलं असेल, अशी साधार अपेक्षा करायला हरकत नाही या डॉ. नीलम गो-हे यांच्या बदलत्या जगातील उद्याच्या स्त्री

विषयीच्या मताशी सहमत होऊन ते मान्य करायची वेळ आता आली आहे असे म्हणावेसे वाटते.

# बाई पण भारी देवा

मंगला राजपूत, ८२७५२५४६३५

**स्त्री मायेचा सागर**
**मुलांना घडविणारी शिल्पकार**
**स्त्री शक्ती अपार, दुर्गेचा अवतार**
**स्त्री घराचा, जगाचा आधार**

स्त्रियांचा आदर करावा, सन्मान करावा त्यांच्याविषयी चांगली भावना असावी स्त्री सबलीकरणासाठी प्रयत्न करावे, उपाययोजना करावेत म्हणून महिला दिन साजरा करतात. कारण स्त्री आहे म्हणून अनमोल मनुष्य जन्म मिळतो, स्त्री आहे म्हणून घराला घरपण आहे, संसाराचा गाडा सुरळीत चालतो.

**रणरागिनी ती झाशीची राणी**
**स्त्री सावित्री, माता दुर्गा भवानी**
**सत्वशील आहिल्या, शूर जिजाई**
**स्त्री नव्हती अबला, स्त्री आहेस करारी**

शहरी भागातील स्त्रियांना आत्मविश्वास, आत्मभान असतं, राहण्या वागण्या बोलण्याचे स्वातंत्र्य असते पण स्त्रिया जर नोकरी करणाऱ्या असतील आणि त्यांना घरून सहकार्य होत नसेल तर त्यांना तारे-वरची कसरत करावी लागते. परंतु निमशहरी भागातील स्त्रियांना राहणे, वागणे बोलणे यांचे स्वातंत्र्य कमी प्रमाणात असते, थोडेसे निर्बंध असतात. तर ग्रामीण भागात मात्र स्त्रियांना राहणे, वागणे, बोलणे बाहेर पडणे, आर्थिक स्वातंत्र्य फारच कमी प्रमाणात असते. रूढी



प्रथा जास्त प्रमाणात असतात. आता थोडासा फरक पडलेला आहे परंतु शहरी भागापेक्षा वातावरण वेगळे असते. मागासलेल्या भागात तर काही कुटुंबात स्त्रियांना पती दारू पिऊन मारहाण करतात ,शिव्या देतात तरी पण बायका संसाराचा गाडा हाकत असतात.

मागच्या वर्षी *बाई पण भारी देवा* हा सिनेमा आला होता या सिनेमात काम करणाऱ्या सहा बहिणी दाखविलेल्या आहेत व त्या संघर्षाच्या परिस्थितीला तोंड देऊन संधीचा फायदा घेऊन बाई पण भारी करतात हा सिनेमा खूप बायकांनी बघितला व त्यांना खूप आवडला, मनोरंजनाबरोबरच खूप आनंद व समाधान वाटले. ऊर्जा मिळाली, प्रेरणा मिळाली, फक्त एवढ्यावरच न थांबता त्यांनीही आपणही आपले बाई पण असेच भारी करावे असा निश्चय केला ही खूपच अभिनंदनीय गोष्ट आहे. जिजामाता, अहिल्याबाई, झाशीची राणी, सावित्रीबाई यांनीही अनेक संघर्षांना तोंड देऊन आपले बाई पण सिद्ध केलेच त्याचबरोबर आत्ताच्या प्रतिभाताई पाटील, कल्पना चावला, पी व्ही सिंधू सारखे अनेक खेळाडू इंदिरा गांधी सारख्या अनेक राजकारणी यांनी आपले बाई पण सिद्ध केलेच. मंगेश पाडगावकरांनी म्हटले आहेच की,

**पेला अर्धा सरला आहे असेही म्हणता येते**
**पेला अर्धा भरला आहे असेही म्हणता येते**
**अर्धा भरला आहे की अर्धा सरला आहे**
**हे तुम्हीच ठरवायचे आहे**
**सांगा कसे जगायचं कण्हत कण्हत**
**की गाणं म्हणत** (पान ४ वर)

विलास कुडके
मो.९२७१६५०४७९

दुर्मिळ पुस्तके

# गारगोट्या

## लेखक : दि.ल. देवधर

गारगोट्या हा दि. ल. देवधर लिखित लघुनिबंध संग्रह केशव भिकाजी ढवळे यांनी १९४५ मध्ये प्रकाशित केलेला आहे. मुखपृष्ठ रघुवीर मुळगांवकर यांनी केले आहे. उगीच, आगामी वाङमय, खिलाडू वृत्ति, ३१ तारीख, प्रश्नचिन्ह, डूल, गम्मत म्हणून, सफाई, फिटंफाट, त्रासदायक गोष्टी, भेट, शिष्टाचार, सूचना फलक, गाडीतील कोपरा, खट्याळपणा, द्राविडी प्राणायाम आणि हसण्याच्या तर्हा अशा हलक्या फुलक्या विषयांवरील १७ लघुनिबंध यात आहेत.

उगीच* या लघुनिबंधात इंग्रजी भाषेला आपली मायबोली मानणारा एक गृहस्थ लेखकाचा मित्र आहे. तो म्हणत की तुमच्या मराठी भाषेत इंग्रजी भाषेची सफाई नाही. इंग्रजी भाषेइतकी ती अर्थवाही नाही. इंग्रजी भाषेत असे छोटे छोटे शब्द आहेत की त्यांचं मराठी भाषांतरच करता यायचं नाही. लेखक त्यांना मराठीतील अर्धांगी, इश्श, उगीच या शब्दांचे इंग्रजी भाषांतर विचारतात तर तो निरुत्तर होतो. यातील उगीच या शब्दाच्या वापरावर हा मजेशीर लघुनिबंध आहे. ओशाळणे, लाजणे, चीड येणे, राग येणे या प्रसंगातून उगीच शब्द कसा वापरला जातो त्याची मनोरंजक पध्दतीने उदाहरणे दिली आहेत.

आगामी वाङमय* या लघुनिबंधात नवीन पुस्तकाच्या वेष्टणावर आगामी संकल्पित वाङमयाची यादी लेखक देतो त्याबद्दल लिहिले आहे. अशा प्रकारची यादी म्हणजे लेखकाने वाचकांना दिलेले अभिवचन असते. प्रतिथयश लेखकाने अशी यादी दिली तर वाचक सुखावतात व वाट पाहतात पण होतकरु लेखकाची यादी पाहिली की त्यांची अगदी वेगळी भावना होते. आधीच्या पुस्तकांनी त्यांची निराशा झाली की आगामी यादी नकोशी होते. दोन्ही लेखकांच्या आगामी वाङमय यादीतील फरक विनोदी पद्धतीने मांडला आहे.

खिलाडू वृत्ती* खिलाडी वृत्ति म्हणजे एक ढोंग असते. सर्व भावना दाबून उसनं हास्य आणून हदय सूड सूड असा आक्रोश करीत असताना अभिनंदन करण्यासाठी खिलाडी वृत्तीचं ढोंग करावे लागते. हे ढोंग इतकं लोकप्रिय कसं झालं, ते एक सामाजिक ढोंग कसं ठरलं त्याचं खुसखुशीत वर्णन यात केले आहे.

३१ तारीख* खिशांचा ठणठणाट करणारी ही तारीख एक तारखेइतकीच किंबहुना तिच्यापेक्षा अधिकच महत्त्वाची कशी आहे ते यात मनोरंजक शैलीत पटवून दिले आहे. विवाहीतांच्या आयुष्यात ३१ तारीख म्हणजे तहाची तारीख असते. महिन्यातील मूर्खपणाचा आढावा घेण्याचा आणि नवीन निश्चय करण्याचा हा दिवस असतो. महिन्याभरातला पश्चाताप करण्याचाही हा दिवस असतो.

प्रश्नचिन्ह* विरामचिन्हांतील प्रश्नचिन्हावर हा गंमतीदार लघुनिबंध आहे. प्रश्नचिन्हांची ढंगबाजी, त्याची आकर्षकता, ते कागदावरच नाही तर चेहर्यावरही कसे उमटते, केव्हा केव्हा ते आपल्यापुढेही कसे उभे राहते? चित्रपटाची जाहिरात करताना थोडे कथानक सांगून पुढे काय होते ते चित्रपटात पहा असे सांगून प्रश्नचिन्ह ठेवले जाते. बातमीमधील प्रश्नचिन्ह, प्रेयसीच्या पत्रातील लाडीक प्रश्नचिन्ह असा हा हलका फुलका रंजक लघुनिबंध आहे.

डूल* आणि *गंमत म्हणून* हे दोन लघुनिबंध यातील पाने गहाळ असल्याने वाचावयास मिळाले नाही.


सफाई* या लघुनिबंधात आंगी नुसतं कौशल्य असून भागत नाही तर सफाईही हवी याचं महत्त्व सांगितले आहे. ड्रायव्हरची गाडी चालविण्यातील सफाई, सिगारेट पिण्यातील सफाई, सायकल चालविण्यातील सफाई, वस्त्र प्रसाधनातील सफाई अशी विविध उदाहरणे देऊन सफाईमुळे कौशल्य आकर्षक दिसतं व त्यात गोडवा नि मोहकपणा येतो हे पटवून दिले आहे. कौशल्य ही कला आहे पण सफाई हा नैसर्गिक गुण आहे हे सांगितले आहे.

फिटंफाट* माणसाच्या स्वभावातील फिटंफाट करण्याच्या प्रवृत्तीवर हा लघुनिबंध आहे.

त्रासदायक गोष्टी* नेहमी लागणार्या लहान लहान वस्तू वेळेवर न मिळाल्याने कसा त्रास होतो याचे गंमतीदार वर्णन यात केले आहे.

भेट* या लघुनिबंधात लग्न, बारसं, मुंज अशा विविध प्रसंगी भेट वस्तू द्यावी लागते त्याबद्दल वर्णन केले आहे.

शिष्टाचार* या लघुनिबंधात छोट्या छोट्या



रीतीभाती, शिष्टाचार याबद्दल कथन केले आहे. आभाराची अपेक्षा ठेवणे, आजारी माणसाला भेटायला जाणे इ. शिष्टाचाराचे यात गंमतीदार वर्णन केले आहे.

सूचना – फलक* 'कारणाशिवाय शिंगं वाजवू नये', 'येथे घाण टाकू नये ', 'गाडी थांबवण्यासाठी साखळी ओढावी' अशा सूचना – फलकांवरील सूचनांचे प्रत्यक्षात पालन होत नाही. वक्तशीरपणे वागा अशी सूचना असते पण तसे कोणी वागत नाही.

गाडीतील कोपरा* प्रवासात गाडीत कोपर्यातील जागा प्रत्येकाला हवीहवीशी वाटत असते त्या वृत्तीवर हा लघुनिबंध आहे.

खट्याळपणा* खट्याळ वृत्तीवर हा हलकाफुलका लघुनिबंध आहे. खट्याळपणा आंगी असणं हे आनंदी मन प्रवृत्तीचे द्योतक ठरते. तरुणवयातील खट्याळपणा, बालवयातील खट्याळपणा इ. चे यात गंमतीदार वर्णन केले आहे.


द्राविडी प्राणायाम* साधी सोपी नि सरळ मार्गाने करता येण्यासारखी गोष्ट लांब पल्ल्याच्या किंवा आड मार्गाने करण्याच्या लोकांच्या सवयींबद्दल हा मजेशीर लघुनिबंध आहे.

हसण्याच्या तर्हा* हास्य म्हणजे हृदयसागरावरील आनंदोर्मींचं प्रतिबिंब. ते मधूर असायलाच हवं. हास्यातील नाजुकता, ओठात हसणं, मंदस्मित, गालांना खळ्या पडणारं गोड हास्य, गंमत करतांनाचं मोठ्याने हासणे, राकट हास्य, खेकाळणं अशा विविध प्रकाराचे यात वर्णन केले आहे.

असा हा अवघ्या ७० पृष्ठांचा छोटेखानी लघुनिबंध संग्रह आहे.

# दोन अक्षरी मंत्र !

अणुशक्ती नगर मधल्या माझ्या एका मैत्रिणीला दोन्ही मुलगेच होते.आम्हा सर्वांची मुलं एकत्रच लहानाची मोठी झाली.जेव्हा आमची मुलं कॉलेजातही जायला लागली तेव्हा आमच्या सीर्शी मधली ती मैत्रीण आम्हाला म्हणाली की 'मला दोन्ही मुलगेच आहेत ग. कधीकधी ना मला, आज ना उद्या त्यांची लग्नं होऊन घरी सुना येतील या विचाराची भीतीच वाटते.काय माहीत मला कशा सुना मिळतील....? हल्लीच्या मुलींच्या इतक्या गोष्टी ऐकतो ना आपण.... !'



आम्हाला तर तिचं बोलणं ऐकून हसूच आलं.आम्ही तिघी मैत्रिणी दोन दोन मुलीवाल्या होतो.आम्ही म्हटलं की ' आम्ही मुलींच्या आयांनी घाबरायचं , त्यांना घर कसं मिळेल.. ? सासरची माणसं कशी असतील..म्हणून.तर तूच काय घाबरते आहेस... ?' मग आम्ही सर्वांनी तिची समजूतही घातली आणि चेष्टाही केली.पण तिच्या मनात या विचाराने घर केलेलं होतंच. एकदा आम्हाला आमच्या कॉलनीतल्या एक ओळखीच्याबाई भेटल्या.त्या आमच्यापेक्षा वयाने मोठ्या होत्या. त्यांना पण दोन्ही मुलगेच होते आणि त्यांची लग्नं झालेली होती. त्यांच्याशी गप्पा मारताना माझी मैत्रीण त्यांना म्हणाली, 'तुम्हाला दोन सुना आहेत. तुम्हाला टेन्शन नाही का येत त्यांच्याशी बोलताना किंवा वागताना... ? त्यावर त्या म्हणाल्या, ' नाही हो. या मुली तशा चांगल्या असतात. फक्त त्यांच्या बाबतीत आपण काही पथ्यं पाळली ना , की काहीच प्रॉब्लेम येत नाही.मग सुनांचे आपल्याशी संबंध कायम गोडीगुलाबीचेच राहातात. माझ्या मुलांची लग्नं ठरल्यानंतर लगेचच, 'घरात सून आली की तिच्याशी कसं वागायचं 'ते मी ठरवून टाकलेलं होतं. पहिली गोष्ट म्हणजे तिला कधीही कुठल्याही बाबतीत टोकायचं नाही...मुळात तिच्याकडून फार अपेक्षाच ठेवायच्या नाहीत..! आता समजा मुलगा आणि सून अचानक बाहेर जायला निघाले, तर 'कुठे जाता? कधी येणार.. ?जेवायला असणार का..... ?'यातलं काहीही त्या दोघांना विचारायचं नाही... ! कधी मुलाने येऊन सांगितलं की ' 'आज 'ही' `षषळलश मधून येताना परस्पर माहेरी जाणार आहे राहायला..' तर त्यावर ,' किती तारखेला परत येणार... ?'असा प्रश्न विचारायचा नाही.किंवा ' तिनेच का नाही मला सांगितलं.. ? तू मध्यस्थ कशाला हवास.. ? मी काय तिला नको म्हणणार होते का..?असलं काहीही बोलायचं नाही.फक्त ''बरं ! एवढंच म्हणायचं. जर मुलगा सून खरेदी करून आले आणि मुलगा म्हणाला की दुकानात नेमका सेल लागलेला होता. म्हणून हिने चपलांचे तीन जोड घेतले. तर, 'चपलांचे चार जोड आधीचेच घरात पडले आहेत.आता हे कशाला हवे होते? आम्ही तर चपलांचा एकच जोड तुटेपर्यंत वापरायचो..!' असं पुटपुटायचं सुद्धा नाही..काय म्हणायचं.. ? '' हो का ... बरं... !''

कधी सून म्हणाली की,'आई , आज माझ्या ५– ६ मैत्रिणी येणार आहेत घरी.तेव्हा तुम्हालाआणि बाबांना आज संध्याकाळी ढत वरच्या संध्याकाळच्या serials नाही बघता येणार.मग तुमच्या खोलीतच बसून राहाण्यापेक्षा संध्याकाळी तुम्ही थोडावेळ गार्डनमधे जाल का..? म्हणजे तुम्हालाही कंटाळा येणार नाही आणि माझ्या मैत्रिणींनाही मोकळं वाटेल.'तर ह्यावर आपण काय म्हणायचं..... ? '' बरं...!''

समजा त्या दोघांचा अचानक बाहेर जेवायला जायचा बेत ठरला तर मुलगाच सांगेल तुम्हाला.'आई आम्ही बाहेर जातोय.बाहेरून जेवूनच येऊ. तर ' अरे मग आधी सांगायला काय झालं होतं... ? बाईला चार पोळ्या कमीच करायला सांगितलं असतं ना ? आता सगळं अन्न उरणार. आणि उद्या आम्हाला सगळं शिळं खावं लागणार... !' अशी कुरकुर करायची का...?छे ...छे... ! मग आपण काय म्हणायचं..? '' बरं !''

आजकाल तर अगदी दिवसाआड amazon मधून खरेदी केलेली रिं-लशश्री घरी येत असतात.मुलं दिवसभर घरात नसतातच.तेव्हा आपणच ती घेऊन ठेवतो.पण ती अजिबात उघडायची नाहीत. ध्याकाळी सून घरी आल्यावर, कपाळावर अगदी एकही आठी न घालता, शांतपणे 'हे तुझं काय काय मागवलेलं आलंय बरं का ग' असं म्हणून सगळं तिच्या ताब्यात द्यायचं.'एवढं काय काय मागवलं आहेस... ?' असं ही विचारायला जायचं नाही.. आणि तिने दाखवलंच तर ''वा.. छान.. !' म्हणायला देखील विसरायचं नाही.

अगदी, आपल्याला नातू किंवा नात झाल्यानंतर, पाच सहा महीन्यांनी कामावर हजर होताना जर सून म्हणाली की 'आता रोज `षषळलश ला जाताना मी बाळाला माझ्या आईकडेच सोडून जात जाईन आणि संध्याकाळी येताना घेऊन येत जाईन.' तर अशा वेळी, तुमच्यात अगदी बाळाला

सांभाळायची आवड आणि ताकद दोन्ही असली तरीदेखील फक्त एकच दोन अक्षरी मंत्र उच्चारायचा ...!

सांगा कोणता....? 'फक्त हा एकच 'मंत्र' तुम्ही सदैव जपत राहिलात, तर मग तुमचं मुलाशी नि सुनेशी असलेलं नातं अगदी निश्चित छान राहील....!'

....खरंतर हा मंत्र मुलांच्या आणि मुलींच्या, दोन्ही आयांनी पक्का लक्षात ठेवणं आवश्यक आहे. एकूणच मुलांच्या संसारात कोणतीच लुडबूड करायची नाही. की त्यांना सल्ले द्यायलाही जायचं नाही...मग कित्ती सोपं होऊन जाईल ना सगळं....? मात्र कायम हे लक्षात असूदे की कधीकधी,अगदी सोप्प्या वाटणा–या गोष्टीच सगळ्यात कठीण असतात बरं का....!!!

**–मंगला खानोलकर**

डॉ.कांचन परांजपे
मो.८६२३००९२४४

आरोग्यवर्धिनी

# पंचामृत फायदे

१) स्मरणशक्ति वाढते
२) शरिर निरोगी राहते
३) अँसिडिटि साठि उत्तम उपाय
४) शक्तिवर्धक आहे.

घटक– साखर १ चमचा, मध १ चमचा, ताजे दहि २ चमचे, साजूक तूप २ चमचे, कोमट दूध ५ चमचे (वरिल प्रमाणात आणि वरील क्रमाने)

हे रोज घेतल्यास शरीर शक्ति, स्फूर्ति, स्मरणशक्ति वाढते. , कांती उजळते, हृदय, मेंदू यांचे पोषण होते.वात, पित्त, कफ, ह्या त्रिदोषांचे संतुलन होते. या पंचामृत मध्ये चिमुटभर केशर घातल्यास अजून फायदेशीर.. केशर रक्तधातू वाढवणारे आणि रक्तशुद्धि करणारे आहेत.

पंचामृत :– पंचामृत म्हणजे दहि, दूध, तूप, मध, आणि साखर अथवा गूळ समप्रमाणात एकत्र घेणे. फक्त तूप किंवा मध समप्रमाणात घेऊ नये. दोघां पैकी एकाचे प्रमाण थोडेसे जास्त घ्यावे.

दूध : गाईचे दूध सर्वात श्रेष्ठ. ते पचायला हलके, गोड, पित्ताचा नाश करणारे, बळ देणारे आहे. शेळिचे दूध हे हि पथ्यकर आहे., दूध तापवून प्यावे. दूध कुठल्याहि आंबट फळाबरोबर, मासे, खार्या पदार्थांसोबत, घेऊ नये. त्यामूळे शरीरात विषारी घटक उत्पन्न होतात.

दही : दहि खातांना थंड असले तरी पचल्यानंतर उष्ण गुणाचे होते, गोड, व्यवस्थित लागलेले दहि पुष्टिकर असते. अर्धवट लागलेले दही किंवा आंबट दहि रक्त दूषित करून त्वचाविकार निर्माण करते. सूज वाढवते. दहि गरम करू नये. दहि रात्री खाऊ नये. सर्दि, खोकला, असतांना दही खाऊ नये.

तूप : तूप भूक वाढवणारे, स्मृती, बुद्धि वर्धक, त्वचेचे कांतिवर्धन करणारे असते. डोळ्यांची आग होणे, दुखणे, यासाठी उपयोग.

अजीर्ण असताना खाऊ नये. पोट साफ होण्यासाठी रात्री झोपताना गरमदूध+ तूप घ्यावे. नाक लाल होउन रक्त येत असेल तर नाकात तूप सोडावे. डोळ्यांसाठी तूप, मध, साखर रोज खाल्याने फायदा होतो.

मध : मध गोड, रूक्ष, कफावर कार्य करणारा आहे. मध गरम करून अथवा उष्ण पदार्थासह खाऊ नये. डोळ्यात मध घातल्यास डोळ्यांना फायदा होतो. मध पाण्याने वारंवार लागणारी तहान शमते. तोंड आले असता मध घालून पाण्याच्या गुळण्या कराव्या.

साखर : साखर/ गुळ. तहान कमी होते. खडिसाखर सर्वश्रेष्ठ असते.

पंचामृत फायदे– शरीर पुष्ट करते, पोटात आग पडणे, जळजळ थांबवते. मानसिक शांती देते. मनावरचा ताण कमी होतो.बुद्धिवर्धक, वजन वाढवते, सकाळी उठल्याबरोबर घेतले अधिक चांगले फायदे मिळतात.



# नारी तू नारायणी



अहाहा! नारी तू नारायणी किती छान उपमा दिलीय स्त्रीलाअहो अशा अनेक उपमा दिलेल्या आहेत स्त्रियांना. स्त्रीला देवीचे रूप देऊन मखरात बसवले जाते तिथे तिची मनोभावे पूजाही केली जाते मग ती पूजा पुरुष करो कि स्त्री प्रेमाने, निर्मळ भावनेने केली जाते. त्यावेळेस पुरुषाच्या मनात हे कधीच येत नाही की ती देवी एक स्त्रीचे रूप आहे परंतु तेच जर सामाजिक कामात, राजकीय क्षेत्रात नोकरीच्या क्षेत्रात स्त्रियांसोबत काम करताना पुरुषी अहंकार हा जागृत होत असतो तिथे मात्र स्त्रियांना अपमानास्पद किंवा सुडाच्या भावनेने वागवले जाते किंवा तिला पुढे येऊ दिले जात नाही. अहो हेच काय न्यायदेवता हे पण स्त्री चे रूप आहे ना, पण तो तिच्याही डोळ्याला पट्टी बांधलेली असते. सीतामाता सुद्धा देवी असून लंकेतून आल्यावर त्यांना लोकांची अवहेलना सहन करावी लागली मग आपण तर एक सामान्य स्त्री आहोत पुरुषांनी कितीही चुकीचे वागले असभ्यवर्तन केले तरी त्यांना साथ देणारे पुरुष मंडळी सतत तत्पर असतात पण ते स्त्रियांना काही कारण नसतानाही बदनामी करणारे पुरुषच असतात. तात्पर्य एवढेच स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात कितीही पुढे गेल्या तरी त्यांना त्यांच्या अस्तित्व मानसन्मान ,आत्मविश्वास स्वतःचा स्वतःच मिळवावा लागेल वेळ येईल तेव्हा दुर्गा पण होता आले पाहिजे आणि वेळ आली तर रण रागणी झाशीची राणी सुध्दा होता आले पाहिजे. स्त्रियांना आता खूप स्वातंत्र्य मिळाले परंतु त्यांचे त्यांनी स्वैराचार करू नये असेही मला वाटते. एक स्त्री शिकलेली असो किंवा नसो गृहिणी असो की नोकरदार असो तिला तिच्या स्वतःचा आत्म सन्मान हा असतोच हे तिने विसरता कामा नये. २१ वे शतक जाऊन २२व्या शतकात आपण पदार्पण केले असले तरी जोपर्यंत समोरच्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नाही तोपर्यंत आपण शिकून सुद्धा मागासलेले असणार आहोत. शिवाजी महाराजांच्या राज्यात स्त्रियांना अपमान केला तर त्यांनी त्यांना कडेलोट केले जायचे, त्यांचे हात, पाय छाटले जायचे.शिवाजी महाराजांचे पुत्र म्हणणारे जागे व्हा आणि आधी आपल्या माय, बहिणी लेकि, पत्नी यांना सन्मान द्यायला शिका, म्हणजे आपोआप परक्या स्त्रियांचा अपमान करणार नाही. भारत माता हे पण स्त्री चे च रूप दाखवतात, का नाही भारत पिता असे म्हणतात, कारण स्त्री ही करुणा ,दया, लज्जा यांचे प्रतीक आहे. तिच्या पंखात सगळ्यांना सामावून घेण्याचे बळ आहे म्हणूनच भारत माता असे संबोधले जाते. नका. म्हणून एकच सांगेल स्त्रीयांना मान सन्मान नाही दिला तरी चालेल पण तिचा अपमान मात्र चुकूनही करू

**–सौ.शितल संजय कापुरे,** धुळे

# तिकीट

काल एका दर्दी गायक कलाकाराची भेट झाली.बऱ्याच गप्पा झाल्या.खूप दिवसांनी भेट झाल्याने तो भरभरून बोलत होता. त्यांचा हा किस्सा तुमच्यासाठी,,,

सुमारे १०,१२ वर्षापूर्वी जळगावला प्रख्यात गझल गायक जगजितसिंग यांचा गझल गायनाचा कार्यक्रम झाला.हा कार्यक्रम जैन हिल्स येथे होता. या कार्यक्रमाला आपल्या दर्दी मित्रासह उपस्थित राहण्याचे या कलाकाराने ठरवले. तिकिटाचे दर त्याच्या मानाने खूपच होते.प्रत्येकी हजार रुपये म्हणजे चार तिकिटांना चार हजार लागणार. बजेटच कोलमडणार.पण असे कार्यक्रम जिवलग मित्रा सोबतच पहायचे, ऐकायचे असतात. त्यात ज्या मित्रांनी आपल्याला ऐन उमेदीच्या खडतर काळात संगीतक्षेत्रात उभे राहण्यास मदत केली.मदतीचा हात दिला, अशा मित्रांसोबत हा कार्यक्रम पाहणे म्हणजे खास पर्वणी. या मित्रांना न सांगता अनपेक्षित धक्का द्यायचं असे त्याने ठरवले. आणि महत्प्रयासाने चार तिकिटे मिळवली. मित्रांना कळवले. जळगावला जायचे साऱ्यांचे ठरले. प्रत्यक्ष कार्यक्रमाचे दिवशी मात्र एक मित्र सोडला तर, बाकी दोन मित्र काही कारणास्तव येऊ शकले नाही.शेवटी दोघेच जळगावला पोहचले. कलाकाराच्या खिशात दोन जादा उरलेली तिकिटे होती.ती तिथे गेल्यावर कुणाला तरी विकून टाकू असे त्याने ठरवले. कार्यक्रमस्थळी दर्दी लोकांची चांगलीच येजा चालली होती.बाहेर काही लोक तिकिटाचे प्रतीक्षेत होते.बऱ्याच लोकांना तिकिटे मिळाली नाहीत .ती तिकीट मिळते का? म्हणून शोध घेत होती. खिशातली दोन तिकिटे सहज विकली जाणार म्हणून कलाकार खुश झाला. तसे काही करणार तेव्हढ्यात, त्याचे लक्ष रस्त्याच्या कडेला एकट्या उभ्या एका तरुणांकडे गेले. तो दुरूनच सारे पहात होता. कार्यक्रम पहायला त्याच्याकडे तिकीट नसावे किंवा तिकीट काढायला पैसे नसावेत. हे त्याच्या हालचाली वरून दिसत होते. कलाकाराने त्याला हात देऊन जवळ बोलावले. विचारपूस केली.कार्यक्रम बघायचा का? म्हणून विचारले. त्याने मी सहज आलोय म्हणून सांगितले. पण त्याचे उत्तर खोटे होते. तसे त्याच्या चेहर्यावरचे भाव सांगत होते . ते पाहून कलाकाराला त्याचे उमेदीचे आणि खडतर दिवस आठवले. एकेकाळी तो ही असाच कुठेतरी होणाऱ्या कार्यक्रमाचे स्थळी ताटकळत उभा असे. पैसे नसल्याने तिकीट काढता येत नव्हते तेव्हाची घालमेल आठवली. सारे आठवून त्याने त्या तरुणाला जवळचे एक तिकीट देऊ केले. पण, माझ्याकडे पैसे नाहीत, असे म्हणत त्याने ते घेतले नाही. त्यावर हा कलाकार त्याला म्हणाला, मित्रा, पैसे नकोत मला.ह्या तिकिटावर खरा तर तुझाच अधिकार आहे. दर्दी माणूस हा प्रेक्षकांतच असायला हवा. हीच त्या कलाकाराला सर्वोच्च दाद असते. असे म्हणत कलाकाराने हातातले तिकीट त्या तरुणाच्या खिशात बळजबरीने कोंबले. त्या तरुणांच्या डोळ्यात आलेलं पाणी पुढचे सारे सांगून गेले. त्याचा खांद्यावर हात ठेवत कलाकार म्हणाला, ,,,, चल मित्रा, आज मी एका सच्च्या रसिकाला तिकीट देऊन स्वतःला एक ऋणातून मुक्त करतोय. आणि त्यांची पावले सभागृहाकडे वळली. ( यातला कलाकार म्हणजे अमळनेर मधील प्रसिद्ध गायक संजय अहिरे हे आहेत.)

**–भाऊसाहेब देशमुख, अमळनेर,**
९४२०३८९५४१

# बाई पण भारी देवा

(पान ३ वरुन)

**परंतु जीवन हसत हसत जगावे**

हे बाई पण भारी देवा या सिनेमाने सांगितले. उगीचच रडत बसण्यापेक्षा आहे त्या परिस्थितीला तोंड देऊन यशस्वी व्हावे हेच ह्या सिनेमाने सांगितलेले आहे. कारण स्त्री ही मुळातच सर्जनशील आहे, सबल आहे. पूर्वीच्या काळी म्हणजे १९ व्या शतकात चूल आणि मूल एवढंच स्त्रियांचं क्षेत्र मर्यादित होतं, त्यांना उंबरठाही ओलांडू देत नसत, शिक्षण नव्हते आता सारखे प्रसार माध्यमं नव्हती त्यामुळे बायकांना ज्ञान कमीच होते तर त्या वेळेला बायकांना अक्कल कमीच असते असे म्हटले जायचे परंतु त्याच वेळेला बायकांना पाच – सहा मुलं असायची ही सर्जनशीलता, मुलांचं संगोपन या गोष्टी समजूनच घेतल्या जायच्या नाही किंवा दुर्लक्ष केले जायचे. मुलींनी बाहेर पडू नये मोठ्याने हसू नये मोठ्याने बोलू नये परक्या घरी मुलींना जायचे असते अशा प्रकारे मुलींना वागणूक दिली जायची त्यामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास कमी होता, त्या दुर्बल सारख्या होत्या. त्या नंतरच्या काळात आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे सावित्रीबाई फुले यासारख्या बोटावर मोजण्या इतक्यात स्त्रिया कर्तुत्ववान निघाल्या. सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी १९४८ साली पहिली शाळा काढली तेव्हापासून मुली शिकायला लागल्या. त्यासाठी आताच्या परिस्थितीत मुली स्ट्राँग किंवा सर्वच बाबतीत सक्षम कशा होतील हे आई–वडिलांनी पहावे. म्हणून आता मात्र मुली मुलांच्या बरोबरीने शिकतात मुलांच्या बरोबरीने नोकऱ्या करतात मुलांच्या बरोबरीने इंटरनेटवरून ज्ञान मिळवतात त्यामुळे आता मुली कुठेही मागे नाहीत . सरकारही स्त्रियांना स्त्रियांसाठी बचत गट चालवते व्यवसाय सुरू करायला मदत करते त्यामुळे स्त्रिया आत्मनिर्भर होऊ लागले आहेतआणि आता तर महाराष्ट्र सरकारने मुलींना उच्च शिक्षणही मोफत केलेले आहे त्यामुळे मुलींना, स्त्रियांना आपले बाई पण नक्कीच भारी करता येईल.

परंतु थोड्या प्रमाणात अजूनही मुलींवर लैंगिक अत्याचार होतात, एका राज्यात तर बायकांची विवस्त्र धिंड काढली होती यावरून वाटते की बाई पण धोकादायक भारी.अजूनही काही भागात मागासलेले विचार आहेत , स्त्रीला जिवंत किंवा सजीव न समजता उपभोग्य वस्तू समजून आपसातील भांडणे, मतभेद यासाठी तिच्या वर राग काढला जातो, ही शरमेची बाब आहे.यावरून अटल बिहारी वाजपेयी यांची एक कविता आठवते.

**सुनो द्रोपदी शस्त्र उठाओ**
**तुम्हे बचाने अब गोविंद न आयेंगे**

त्यासाठी तिला समाजाचीही साथ हवी. परंतु महिला दिवस हा स्त्रियांकडे आदराने, सन्मानाने बघण्यासाठी असतो हेच लोक विसरतात त्यासाठी मुलींबरोबरच मुलांवरही शिवाजी महाराजांच्या प्रमाणे परस्त्रीकडे माता भगिनी सारखे बघावे हे संस्कार आईने मुलांवर करणे आवश्यक असते .

**नव्या युगाच्या नारी आम्ही**
**नाही अबला आम्ही**
**जगू बिनधास्त**
**उंच भरारी घेऊ आम्ही बिनधास्त**

परंतु याबरोबरच सर्व गोष्टींचं भान किंवा जाणीव ठेवणे आवश्यक असते. काही मुली लव्ह जिहादच्या नावा खाली फसतात. त्यावेळेला आई–वडिलांच्या मनाचा विचार करावा. मुलींची राहणी, आचार, विचार सभ्यपणाचे असावे तसेच स्त्रीला अर्धांगिनी म्हटले जाते त्यामुळे स्त्री पुरुष एकमेकांना पूरक असतात म्हणून कोणी कमी किंवा जास्त असे न समजता आपापली कर्तव्ये जबाबदारीने पार पाडावीत. एकमेकांना समजून घ्यावे, छोट्याशा कारणांवरून घटस्फोट घेणे योग्य नव्हे

**उठ उठ नारी तू घे भरारी**
**बन तू करारी, बन तू करारी**

मुलींनी लहानपणापासून शिक्षणाकडे लक्ष द्यावे ,वाचन करावे, उच्च शिक्षण घ्यावे, नोकरी करावी व्यवहार ज्ञान मिळवावे, महिलांनी व्यवसाय करावेत,मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन आणि संघर्षाला तोंड देऊन बाई पण भारी करावे. स्त्रियांनीही परिस्थितीला ,नशिबाला दोष न देता बाई पण भारी करावे. तेव्हाच महिला दिन साजरा करताना विशेष आनंद वाटेल.

एका कवितेत म्हटले आहे–

**नका म्हणू देवी आम्हा**
**फक्त समानतेने वागवा**
**माणूस म्हणून जगण्यासाठी**
**मानसिकता तेवढी बदलवा**



सौ.सुमती पवार
मो.९७६३६०५६४२

गाव माझे सुंदर

# इव्हेंट पापडांचा..!

कापडणे

नमस्कार मंडळी, लहानपणी सगळीच मुले ढाराढूर झोपतात. चुकून कधीतरी पहाटे जाग आली की, मला घुरू घुरू असा भरडकीचा आवाज यायचा.डोळे उघडून पाहिले की, आई लांब पाय करून भरडकीवर हरभरे भरडत असले-ली दिसायची.दिवसाच्या कामांमध्ये ह्या कामांना वेळ नसायचा. मग अशी रात्र पहाट करून जागून ती अशी कामे करायची. मला आता जात्यावर भरडकीवर काही काम करायला सांगितले नि मी जाते ओढले तर मला (लहानपणी मी जात्यावर दळू लागले आहे.मसाले ही दळले आहेत.) आता कळते की जाते ओढायला कष्ट लागतात. ते काही १/२ मिनिटे ओढायचे नसते. पायली दोन पायली गहू दळायला तास दोन तास सहज लागायचे.म्हणजे तास दोन तास जाते ओढायला आईला किती श्रम करावे लागायचे? बाप रे! आता आठवले की अंगावर काटा येतो! दळून उठल्या की दोन्ही बायका घामाघूम झालेल्या असायच्या. मला आठवते,



सारे चित्र डोळ्यासमोर दिसते. खूऽऽऽ प वाईट वाटते ते याचे की, हे जे आज वाटते ते तेव्हा काहीच कळत नव्हते याचे वाईट वाटते. किती श्रम हो? ते ही विना तक्रार .. ते जीवन. त्यांनी अपरिहार्य म्हणून मनापासून स्वीकारलेले असले, त्यांची काही तक्रार नव्हती तरी आज वाटते, बाप रे! केवढे कष्टांचे जीवन होते या सर्वच महिलांचे! कुटुंबासाठी त्यांनी ते कर्तव्य व प्रेमातून अंगिकारलेले होते. मी कधी कधी आई दळत असतांनाही मांडीवर डोके ठेवून झोपल्याचे मला आठवते. तिचे ते जाते ओढतांनाची पायाची लयबद्ध होणारी हालचाल मला मांडीतला झोका वाटत असावा म्हणून तर दळतांनाही मांडीवर डोके ठेवून मी झोपत असे.

आता वाटते, तिच्या ह्या कष्टांची जाणिव तेव्हाच का नाही झाली? रात्री उशिरा पर्यंत किंवा पहाटे लवकर उठून तिला ही कामे करावी लागत. (हीच स्थिती घरोघर होती.)कारण दिवसाची भरपूर कामे असायचीच! भरडून झाले की ते पाखडणे, गाळून चांगली डाळ बाजूला व कण्या वेगळ्या करणे. तत्पूर्वी हे हरभरे मोठ्या पातेल्यात रात्री भिजवावे लागत. ते भिजून टम्म फुगले की त्यांना मोठ्या कापडावर पसरवून तेल लावायचे. मग सकाळी ते उन्हात पसरवायचे.खडखडीत झाले की मग भरडायचे. म्हणजे चांगल्या प्रतिची डाळ मिळते असे ती सांगे. हे भिजलेले हरभरे घरोघर थोडे थोडे वाटायची पध्दत होती. घुगऱ्या म्हणत त्याला. मग घरोघर घुगऱ्या शिजत असत. हरभरा, तूर, मूग, मठ ही कडधान्ये शेतातच कडेकडेने पेरलेली असत. हरभरा(हिवाळ्यात) थोडा जास्त असे. बाकी घरापुरते असे. वर्षभर पुरतील अशा अंदाजाने पेरत असत.खरिपात तीळ भगर, राळा देखिल पेरलेला असे.एकूणच फार कष्टांचे जीवन असले तरी त्या काळच्या बायकांनी ते विना तक्रार स्वीकारलेले होते.

आई म्हणायची, पहाटे उठून रोज दळण्याचा इतका धसका असे मनात की दळून झाल्यावर आमची एक झोप होत असे. म्हणजे पहा रोज-चे दळण अधिक ह्या डाळी साळी करणे. ह्या डाळींचा चुरा वेगळा भरलेला असे डब्यात. आई तो चुरा भिजवायची, मला वाटायला लावायची, व त्याची तिखट मीठ कांदा घालून मस्त थालिपिठे बनवायची. आम्ही त्याला कोंडाये म्हणायचो. आजचे सुखासीन जीवन बघता आता वाटते की किती कष्टमय जीवन होते ह्या स्त्रियांचे. बरे हेच असेच असते असे म्हणत त्यांनी ते स्वीकारलेले हो-ते. बराच मोठा समाज असा होता की, घरची ही सारी कामे निपटून त्यांना १० वाजता इतरांच्या शेतात रोजगारासाठी जावे लागे. म्हणजे घरातली कामे, पोरवडा सांभाळून रोजगाराला जायचे व येतांना रात्री

साठी चुलीला सरपण गोळाकरत यायचे. आल्या आल्या मोळी दारात टाकली की,चुल पेटवायची व भाकऱ्या भाजायच्या वाढायचे ही सारी कामे असतंच. हातावर पोट असणाऱ्यांचे जीवन मोठे कठीण होते.पण नावालाही तक्रार नव्हती. जे जे नशिबी आले ते ते प्राक्तन म्हणून स्त्रियांनी मुकाटपणे स्वीकारले व ते च ते रूढी बनून त्यांच्या बोकांडी बसले. पुरूष प्रधान समाज पान चघळत ऐश करत त्याकडे फक्त बघत राहिला. ना त्याला त्याचे सोयर होते ना सुतक होते.२४ तास सारी सुखे फुकट देणारी शिवाय त्याच्यावर प्रेम करणारी, तो कसा का असेना त्याच्या नाव-ाचे कुंकू मंगळसूत्र मिरवणारी व त्याचा अभिमान बाळगणारी बावळट मोलकरीण सदैव त्याच्या से-वेला सज्ज होती. वाटते, किती नशिबवान आहेत ना पुरूष! अहो, तो राबतो त्याच्या दुपटीने आज ही ती राबतेच आहे. जरा एकच पोर वागवून वाढवून अनुभव घेतला की कळते, तळहाताचा पाळणा म्हणजे काय असते ते! अर्थात प्रत्येक गोष्टीला काही अपवाद असतातच! तसे चांगले समजुतदार पुरूषही असतात पण अपवादानेच!

हिवाळ्यात अजून एक मोठा इव्हेंट असे. वडे पापडांचे दिवस.वा..! आमची काय मज्जा असे! आमची ५/६ घरे गोलाकृती वाड्यात आहेत. आम्ही असतांनाचे वाड्याचे वैभव आता नाही राहिले.भंगले, चिरफळ्या झाल्या आ-हेत त्याच्या.ह्या गोलाकृती वाड्यात एका वेळी १५/२० बायका खाटेवरच्या पाटावर शेवया वळायला (करायला) बसू शकत असत. पापड (पान्यापापड म्हणजे गव्हाची पिठी एका मोठ्या डेगेत पाण्यात कालवून मीठ पापडखार घालून, अढी खणून त्यात मोठमोठी लाकडे टाकून ती डेग त्या चुलीवर ठेवायची व मोठ्या पळीने सा-लदाराने ती ढवळायची. चुलाणावर गदागदा ते पिठ शिजायचे. ते शिजले रे शिजले की आम्ही ताटल्या भरून सालदाराकडून घरात आणायचो. त्या गरमागरम पिठात गुळ व म्हशीचे दूध घालायचे व ते चमच्याने ओरपायचे. वाह रे ! वा..! आताही तीअढी, ती चूल,मोठ्या वाढीने बादल्यांमध्ये काढलेले ते दाटसर पिठ व गुळ दूध टाकून घरातल्या दारात बसून खाण-ारी परकरातली मी मला दिसते आहे. मनसोक्त ते चविष्ट पिठ खाऊन ड्युटी लागायची ती धाब्यावर बसायची. हो, सालदार ते पिठ धाब्यावर बादल्या भरून शिडीने चढवायचा व २/३ बायका धोतरे धाब्यावर अंथरून पळीने ते पापड घालायच्या.पूर्ण धाब्यावर पापडच पापड!

ह्या पापडांना घारी कावळे टोचे मारायच्या म्हणून एका खाटेला तिरपी काठी लावून, सावलीला वर गोधडी टाकून खाटेखाली राखायला आमची स्वारी बसत असे. घारी कावळे आले की हाकलायचे व पुन्हा खाटेखाली बसायचे. जमले तर अभ्यास करायचा. असे ते पापड दिवसभर वाळले की ती धोतरे तशीच संध्याकाळी खाली आणून खाटेवर पालथी घालायची. सकाळी पुन्हा पाठीमागच्या बाजूला पाणी शिंपडून अलगद ते पापड काढायचे व उन्हात वाळवायचे. ते वाकडेतिकडे पापड मोठे मजेदार दिसत व ओले ओले खायलाही मोठे मजेदार लागत. आणि खडखडीत वाळल्यावर तापल्या तेलात असे काही फराफरा उठत की बस्स बघतच रहावे. असा हा पापडाचा मोठा घाट असे. बाबा रे ! तेच लोक करू जाणेत हे! आणि मग हे वाळले पापड ठेवणीच्या खो-लीत एकावर एक ठेवलेल्या मोठमोठ्या माठात, रांजणात वर्षभरासाठी विराजमान होत असत.

सणासुदीला, खिचडीबरोबर हे कुडूमकुडूम पापड मोठे चवदार लागत व बायकांच्या मेहन-तीचे चिज होत असे.(त्या पिठात टाकलेले तीळही दिसत असत.) तेव्हा हिशोबच पायलीचा असे, आजच्या सारखा किलो दोन किलोचा नसे. खाणे ही दमदार व जगणे ही दमदार होते.आजचा जमानाच किलो दोन किलोचा आहे, आहे कुठे वेळ कुणाला? धन्यवाद मंडळीबाय बाय !

---



विकास कपोले
मो.९४०३४२५७७७

पिवळे पान-नवे भान

# मित्र जपा मैत्री जपा!

वृद्ध लोक जेव्हा जास्त बोलतात तेव्हा ते टोमणे मार-तात, परंतु डॉक्टर ते वरदान मानतात: डॉक्टर म्हणतात की सेवानिवृत्तांनी (ज्येष्ठ नागरिकांनी) अधिक बोलले पाहिजे कारण सध्या स्मरणशक्ती कमी होण्याचे रोखण्याचा कोणताही मार्ग नाही. अधिक बोलणे हा एकमेव मार्ग आहे. अति बोलण्याचे किमान तीन फायदे ज्येष्ठ नागरिकांना होतात.

प्रथम:✻ बोलणे मेंदूला सक्रिय करते आणि मेंदू सक्रिय ठेवते, कारण भाषा आणि विचार एकमेकांशी संवाद साधतात, विशेषत: जेव्हा पटकन बोलले जाते, ज्यामुळे नैसर्गिकरित्या विचारांची गती जलद होते आणि स्मरणशक्ती देखील वाढते. जे ज्येष्ठ नागरिक बोलत नाहीत त्यांना स्मरणशक्ती कमी होण्याची शक्यता असते.

दुसरा:✻ जास्त बोलल्याने तणाव दूर होतो, मानसिक आजार टळतो आणि तणाव कमी होतो. आपण अनेकदा काही बोलत नाही, परंतु आपण ते आपल्या हृदयात दडपतो आणि गुदमरल्यासारखे वाटते आणि अस्वस्थ वाटते हे खरे आहे, म्हणून, वरिष्ठांना अधिक बोलण्याची संधी देणे चांगले होईल.



तिसरा:✻ बोलण्यामुळे चेहऱ्याच्या सक्रिय स्नायूंचा व्यायाम होतो तसेच घशाचा व्यायाम होतो आणि फुफ्फुसाची क्षमता वाढते, तसेच डोळे आणि कानांना होणारा हानीचा धोका कमी होतो आणि चक्कर येणे, डोके चढणे आणि बहिरेपणा यासारखे सुप्त धोके कमी होतात.

थोडक्यात,✻ सेवानिवृत्त, म्हणजे ज्येष्ठ नागरिक, अल्झायमरपासून बचाव करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तुम्ही शक्य तितके बोलणे आणि लोकांशी सक्रियपणे संवाद साधणे. याला दुसरा कोणताही इलाज नाही.

वयाच्या ५५ वर्षापुढील सर्वांनी खालील दहा कृती टाळाव्यात:

१. जीने चढू नका, गरजच असेल तर ऋआधाराच्या पाईपला घट्ट धरून चालावे.

२. आपले डोके गतीने फिरवू नका, आधी आपले पूर्ण शरीर वॉर्मअप करा.

३. आपले शरीर वाकवून पायांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करू नका आधी पूर्ण शरीर वॉर्मअप करा.

४. आपला पायजमा उभ्याने न घालता बसून घाला.

५. झोपेतून उठताना तोंड समोर ठेऊन उठू नका तर डाव्या अगर उजव्या कुशीवर वळून उठा.

६. उलटे चालू नका त्याने गंभीर इजा होऊ शकते.

८. खाली वाकून जड वस्तू उचलू नका तर आधी गुडघ्यात वाकून मग उचला.

९. झोपेतून उठताना जलद न उठता प्रथम काही मिनिटे शांत बसून मग उठा.

१०. संडासला जोर लावू नका नैसर्गिक होऊ द्या. अजून महत्त्वाचे नेहमी कृतिशील रहा व सकारात्मक विचार ठेवा कारण आयुष्यभर काबाडकष्ट केल्यानंतर आता खरे जीवन आनंदी जगण्याची वेळ आहे.

१ वरचेवर मित्रांच्या संपर्कात जरूर रहा मनसोक्त पैसे ,वेळ खर्च करा

✻ आयुष्य मर्यादित आहे आणि जीवनाचा जेंव्हा शेवट होईल, तेंव्हा इथली कोणतीच गोष्ट आपल्या सोबत नेता येणार नाही. ✻ मग जीवनात खुप काटकसर कशासाठी करायची ? आवश्यक आहे तो खर्च केलाच पाहिजे ज्या गोष्टींतुन आ-पणास आनंद मिळतो त्या गोष्टी केल्याच पाहिजेत. ✻ आपण गेल्यानंतर पुढे काय होणार याची मुळीच चिंता करु नका. कारण आपला देह जेंव्हा मातीत मिसळून जाईल तेंव्हा कुणी आपले कौतुक केले काय किंवा टीका केली काय ? ✻ जीवनाचा आणि स्वकष्टाने मिळवलेल्या पैशांचा आनंद घेण्याची वेळ निघून गेलेली असेल ...! ✻ १ तुमच्या मुलांची खुप काळजी करु नका. त्यांना स्वत:चा मार्ग निवडू द्या. स्वत:चे भविष्य घडवू द्या. त्यांच्या ईच्छा आकांक्षाचे आणि स्वप्नांचे तुम्ही गुलाम होऊ नका .✻ मुलांवर प्रेम करा त्यांची काळजी घ्या, त्यांना भेटवस्तुही द्या. मात्र काही खर्च स्वत:वर स्वत:च्या आवडी निवडीवर करा ✻ जन्मापासून मृत्युपर्यंत नूसते राबराब राबणे म्हणजे आयुष्य नाही हे देखील लक्षात ठेवा ✻ आपल्या आरोग्याची हेळसांड करुन पैसे कमवण्याचे दिवस आता संपले आहेत. पुढील काळात पैसे मोजून सुद्धा चांगले आरोग्य मिळणार नाही . ✻ या वयात प्रत्येकापुढे दोन महत्त्वाचे प्रश्न असतात. पैसा कमवणे कधी थांबवायचे आणि किती पैसा आपल्याला पुरेल. १ तुमच्याकडे कितीही एकर सुपीक शेतजमीन असली तरी तुम्हाला दररोज किती अन्नधान्य लागते ?

तुमच्याकडे अनेक घरे असली तरी रात्री झोपण्यासाठी एक खोली पुरेशी असते ! ✻ एक दिवस आनंदा शिवाय गेला तर आयुष्यातला एक दिवस तुम्ही गमावला आहात एक दिवस आनंदात गेला तर आयुष्यातला एक दिवस तुम्ही कमावला आहात हे लक्षात असू द्या. ✻ आणखी एक गोष्ट तुमचा स्वभाव खेळकर उमदा असेल तर तुम्ही आजारातून बरे व्हाल आणि तुम्ही कायम प्रफुल्लीत असाल तर तुम्ही आजारी पडणारच नाहीत. ✻ सगळ्यात महत्वाचे म्हणजे आजूबाजूला जे जे उत्तम आहे, उदात्त आहे त्याकडे पहा. त्याची जपणूक करा ✻ आणी हो, तुमच्या मित्रांना कधीही विसरु नका त्यांना जपा, हे जर तुम्हाला जमले तर तुम्ही मनाने कायम तरुण रहाल आणी इतरांनाही हवेहवेसे वाटाल. ✻ मित्र नसतील तर तुम्ही नक्कीच एकटे आणी एकाकी पडाल. ✻ त्यासाठी रोज व्हाट्सएपच्या माध्यमातून संपर्कात रहा हसा, हसवत रहा मुक्त दाद द्या म्हणूनच म्हणतो आयुष्य खुप कमी आहे ते आनंदाने जगा ... ✻ प्रेम मधुर आहे त्याची चव चाखा..! ✻ क्रोध घातक आहे त्याला गाडून टाका..! ✻ संकटे ही क्षणभंगुर आहेत त्यांचा सामना करा..! ✻ डोंगरा आड गेलेला सूर्य परत दिसू शकतो पण .... ✻ काळाच्या पडद्या आड गेलेले जीवलग परत कधीच दिसत नाहीत ...

---



नरेंद्र नेरपगार (CA)

अर्थवेध

# जीएसटी नोंदणी करणे कोणाला आवश्यक आहे?

०१ जुलै २०१७ पासून भारतात जीएसटी लागू करण्यात आला त्या पूर्वी प्रत्येक राज्यात व्हॅट वेगवेगळा आकारला जात होता. त्यात दरा बाबत फार भिन्नता होती. वेगवेगळ्या राज्यात टॅक्स राज्य शासनाकडून आकारला जात होता. उत्पादनावर एक्साईज ड्युटी (उत्पादन शुल्क) केंद्र सरकारकडून आकारला जात होता. विक्रीवर व्हॅट व सेवा वर सर्विस टॅक्स आकारला जात होता. त्यामुळे प्रत्येक व्यापाऱ्याला वेगवेगळ्या करां चे अनुपालन करावे लागत होते त्यामुळे एक जुलै २०१७ पासून एक्साईज ड्युटी, सर्विस टॅक्स आणि व्हॅट रद्द करून जीएसटी लागू करण्यात आला.

जीएसटी म्हणजे वस्तू व सेवा कर. जीएसटी कर भारतातील उत्पादने आणि सेवांच्या पुरवठ्यावर आकारला जातो. तसेच जीएसटी एक अप्रत्यक्ष कर आहे. जेव्हा व्यवसायाची एकूण (विक्री)उलाढाल विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तेव्हा जीएसटी लागू होतो. मर्यादेपेक्षा कमी (विक्री)उलाढाल असलेले स्वैच्छिक नोंदणी करू शकतात. राज्यांची व केंद्रशासित प्रदेश त्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेता. जीएसटी नोंदणीची मर्यादा वेगवेगळे आहेत. महाराष्ट्रासाठी जीएसटीसाठी नोंदणी मर्यादा वस्तूच्या विक्री म्हणजेच पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांसाठी पूर्वी २० लाख रुपये होती, जी वाढवून आता ४० लाख रुपये करण्यात आली आहे. आता ४० लाखांपेक्षा जास्त उलाढाल (विक्री) असलेल्या सर्व व्यवसायांना जीएसटी नोंदणी करणे आवश्यक आहे. व सेवांचा पुरवठा करणाऱ्यांसाठी जीएसटी नोंदणी ची मर्यादा ही २० लाख आहे. सेवांचा पुरवठा २० लाखापेक्षा जास्त उलाढाल असणाऱ्यांसाठी जीएसटी नंबर घेणे अनिवार्य आहे.

फक्त नोंदणीकृत पुरवठादार बिलावर जीएसटी आकारू शकतो आणि सरकारला जीएसटी भरू शकतो आणि त्याच्या ग्राहकांना इनपुट टॅक्सचे क्रेडिट देऊ शकतो. व्यवसायिकाची उलाढाल म्हणजेच विक्री ४० लाख किंवा २० लाख झाल्यानंतर तीस दिवसाच्या आत त्याला नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक असते.

ज्या वस्तू किंवा सेवांवर जीएसटी लागू नाही त्या वस्तूंचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना जीएसटी रजिस्ट्रेशन घेण्याची आवश्यकता नसते जरी त्यांचा विक्रीची उलाढाल दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त झाली असेल तरीही.

दारू, डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन याचा समावेश जीएसटी अंतर्गत करण्यात आलेला नाही त्यांना पूर्वीचेच कर लागू होतात.

**जीएसटी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

मालक, प्रवर्तक, भागीदार यांचे आधार कार्ड, मालक, प्रवर्तक, भागीदार यांचे पॅन कार्ड, कंपनी किंवा भागीदारी संस्थेचे पॅन कार्ड, पासपोर्ट आकाराच्या फोटोंसह मालक, प्रवर्तक यांचा पत्ता आणि ओळखपत्र पुरावे., बँक तपशील (बँक स्टेटमेंट, पासबुक किंवा रद्द केलेले चेक), व्यवसायाच्या ठिकाणाचा सहाय्यक पत्ता पुरावा - सातबारा किंवा सिटी सर्वे उतारा, व्यवसाय निगमन पुरावा किंवा नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसायाच्या ठिकाणाचे लाईट बिल, व्यवसायाच्या जागेचे ठिकाण स्वत:चे नसल्यास संमती पत्र किंवा नोंदणीकृत भाडे करार.

**जीएसटी नोंदणीचे प्रकार :-**




रेगुलर जीएसटी रजिस्ट्रेशन/ सामान्य करदाता - या कर प्रणालीनुसार विक्रेत्यास खरेदी केलेल्या मालाची इनपुट मिळत असते व ज्या दराने जीएसटी लागू आहे त्याच दराने जीएसटी बिल बनवून मालाची विक्री करावी लागते .या जीएसटी रजिस्ट्रेशनच्या योजनेत खरेदी विक्रीचे सर्व बिल करदात्यास सांभाळावे लागतात. रे-गुलर जीएसटी नोंदणीकृत करदात्याने दिलेल्या बिलात लावलेल्या टॅक्सचा इनपुट खरेदीदारास मिळू शकतो.

**जीएसटी कंपोझिशन टॅक्सपेअर** (Composition Taxpayer) - लहान व्यवसायिकांना जीएसटी कर भरणा सोपा जावा आणि त्यातील जटिलता कमी व्हावी यासाठी जीएसटी परिषदेने कंपोझिशन योजना कार्यान्वित केली आहे या योजनेमुळे छोट्या व्यावसायिकांना फायदा होत असतो तो म्हणजे करदायित्व कमी होते आणि कागदपत्रांची पूर्तता देखील सोपी होते. या योजनेत विक्रीवर ठराविक दराने टॅक्स भरणा करावा लागतो त्याला खरेदीवर लागून आलेल्या बिलावरचा इनपुटचा क्रेडिट घेता येत नाही व तो देत असलेल्या बिलातही जीएसटी लावता येत नाही. साधारणता ट्रेडिंग व मॅन्युफॅक्चरिंग म्हणजे उत्पादनासाठी साठी एक टक्का जीएसटी या योजनेत लागू आहे. रेस्टॉरंट साठी पाच टक्के, सेवेसाठी सहा टक्के या योजनेत विक्रीवर भरावयाचा असतो. खर-दीचे कोणतेही बिल सांभाळण्याचे बंधन या स्कीम अंतर्गत विक्रेत्यास नसते. या योजनेअंतर्गत तिमाही जीएसटी चे रिटर्न भरावे लागते. कंपोझिशन्स स्कीम मध्ये जाण्यासाठी वार्षिक उलाढालीची मर्यादा हॉटेल व्यवसायिक उत्पादक आणि व्यापारांसाठी दीड कोटी आहे तसेच काही ठराविक सेवांसाठी वार्षिक ५० लाख इतकी मर्यादा आहे या मर्यादेच्या आतील लोकांना कंपोझिशन स्कीम मध्ये नोंदणी करून लाभ घेता येतो.

**जीएसटी कंपोझिशन** (Composition) **स्कीम कोण निवडू शकत नाही?**. आंतर-राज्य पुरवठ्याचा पुरवठादार, प्रासंगिक करपात्र व्यक्ती, अनिवासी करपात्र व्यक्ती, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मद्वारे वस्तूंचा पुरवठा करणारे पुरवठादार, आईस्क्रीम, पान मसाला, तंबाखू उत्पादक.

**जीएसटी रिटर्न्स म्हणजे काय?**

जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत व्यवसायिकांना सरकारच्या जीएसटी पोर्टलद्वारे ऑनलाइन व्यवसायाच्या प्रकारानुसार मासिक, त्रैमासिक आणि वार्षिक रिटर्न भरावे लागते. त्यांनी या कालावधीत खरेदी व विक्री केलेल्या वस्तुंचा टॅक्ससह तपशील द्यावा लागतो.

ज्या व्यावसायिकांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी केली आहे, अशा सर्व व्यावसायिक संस्थांना जीएसटी रिटर्न भरावा लागतो.

**रिटर्नचे प्रकार.**

**जीएसटी रिटर्न्स** 1 (GSTR-1) - प्रत्येक महिन्याच्या विक्री बिलाची- बिलाप्रमाणे तपशील जीएसटीआर १ या रिटर्न मध्ये करावा लागतो. जीएसटी रिटर्न्स १ हे मासिक भरावे लागते. हे रिटर्न भरण्याची अंतिम तारीख पुढील महिन्याची ११ तारीख असते.

मात्र ज्या करदात्यांची उलाढाल मागील आर्थिक वर्षातील रु ५ कोटी पेक्षा कमी असते, हे जीएसटी रिटर्न्स १ तिमाहीत दाखल करू शकतात. त्याची रिटर्न भरण्याची अंतिम तारीख पुढील महिन्याची १३ तारीख असते.

**जीएसटी रिटर्न्स** 3B- जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत सर्व सामान्य रेगुलर करदात्यांनी हे दाखल केले पाहिजे. ही एक मासिक स्व-घोषणा रिटर्न आहे ज्यामध्ये बाह्य पुरवठा, दावा केलेले इनपुट टॅक्स क्रेडिट, कर दायित्व आणि भरलेले कर याबद्दल सारांशित तपशील असतो. ज्या करदात्यांची उलाढाल मागील आर्थिक वर्षातील रु ५ कोटी पेक्षा कमी असते त्यांना हे रिटर्न भरण्याची अंतिम तारीख पुढील महिन्याची २२ तारीख असते. ज्या करदात्यांची उलाढाल मागील आर्थिक वर्षातील रु ५ कोटी पेक्षा जास्त असते त्यांना हे रिटर्न भरण्याची अंतिम तारीख पुढील महिन्याची २० तारीख असते.

जर जीएसटीआर 3B उशिरा दाखल केले तर पन्नास रुपये प्रति दिवस विलंब शुल्क आकारले जाते परंतु जर जीएसटी रिटर्न निरंक म्हणजे निल असेल तर वीस रुपये प्रति दिवस विलंब शुल्क आकारले जाते. **जीएसटी सीएमपी**-08 हा रिटर्न कंपोझिशन डीलरने भरावा लागतो. जीएसटी सीएमपी-०८ हे तिमाही भरावे लागते. हे रिटर्न भरण्याची अंतिम तारीख तिमाही पुढील महिन्याची १८ तारीख असते.

**जीएसटी रिटर्न्स** 4- हा रिटर्न कंपोझिशन डीलरने वार्षिक आधारावर भरावा लागतो. संबंधित आर्थिक वर्षानंतर जीएसटी रिटर्न्स ४ भरण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल असते. जर जीएसटीआर ४ उशिरा दाखल केले तर पन्नास रुपये प्रति दिवस विलंब शुल्क आकारले जाते. कमाल ५,००० रुपये, परंतु जर जीएसटी रिटर्न निरंक म्हणजे निल असेल तेथे कमाल विलंब शुल्क रु. ५०० आकारले जाते.

**जीएसटी रिटर्न्स** 9- जीएसटीच्या रेगुलर स्कीम मध्ये रजिस्टर असलेल्या व्यवसायिकांसाठी ज्यांचा दोन कोटी पेक्षा जास्तीची विक्रीची उलाढाल असलेल्यांसाठी जीएसटीआर ९ बंधनकारक आहे परंतु लहान व्यापाऱ्यांसाठी हा पर्यायी केला आहे. या रिटर्न मध्ये आर्थिक लेखा पुस्तके व वर्षभर भरलेली जीएसटी रिटर्न याचा ताळमेळ बसवला जातो व काही भरणा असल्यास तो भरणा केला जातो. जीएसटी आर ९ हा वार्षिक भरावा लागतो. हे रिटर्न भरण्याची अंतिम तारीख. पुढच्या वर्षातील ३१ डिसेंबर पर्यंत असते. जर जीएसटीआर ९ उशिरा दाखल केले तर २०० रुपये प्रति दिवस विलंब शुल्क आकारले जाते.

**जीएसटी रिटर्न्स** 9C - प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती ज्याची आर्थिक वर्षात एकूण उलाढाल रु. ५ कोटी पेक्षा जास्त आहे. त्यांना हा रिटर्न भरणे आवश्यक आहे. लेखा पुस्तके व जीएसटी रिटर्न यांचे आकडे जुळवले जातात व फरक असल्यास फरकाचा तपशील व त्याचे कारण या विवरण पत्रकाद्वारे दिला जा-तो. हे विवरण पत्र देखील वार्षिक भरावा लागतो. हे विवरण पत्र देखील भरण्याची अंतिम तारीख. पुढच्या वर्षातील ३१ डिसेंबर पर्यंत असते.जर जीएसटीआर ९३ उशिरा दाखल केले तर २०० रुपये प्रति दिवस विलंब शुल्क आकारले जाते. त्यामुळे जीएसटी चे रिटर्न वेळेवर भरणे आवश्यक असते.



# साप्ताहिक भविष्य



हर्षल धर्माधिकारी, नाशिक मो.९२२६९९९८२७ दि.१० ते १६ मार्च २०२४

**मेष :** व्यावसायिक प्राप्ती चांगली राहील. नौकरीमध्ये संमिश्र परिणाम मिळतील. संततीच्या समस्येमधून योग्य मार्ग निघतील. विद्यार्थ्यांना कष्टाने यश. सरकारी कामात प्रयत्नाने यश. स्थावराच्या संधी चालून येतील. प्रवासात मौल्यवान वस्तू जपाव्यात. मित्रांच्या ओळखीतून लाभ मिळतील.

**वृषभ :** उद्योग-व्यवसायात आवक चांगली राहील. नौकरीमध्ये ईच्छित स्थळी बदलीचे योग. संततीच्या बाबतीत आर्थिक अडचणी. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे सफलता लाभेल. सरकारी कामात सफलता. जोडीदाराला प्रलोभनात्मक बाबीतून त्रास. प्रवासामधून कामे यशस्वी होतील. मित्रांकडून चांगले सहकार्य लाभेल.

**मिथुन :** व्यावसायिक निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. नौकरीच्या ठिकाणी पारदर्शी रहावे. संततीच्या नौकरी समस्येतून मार्ग निघतील. विद्यार्थ्यांना शुभ परिणाम मिळतील. बोलण्यावर पूर्ण नियंत्रण ठेवावे. सरकारी कामात प्रयत्नाने यश लाभेल. व्यसने नियंत्रणात ठेवावीत. नौकरवर्गामुळे मनस्ताप. मित्रांवर अवलंबून राहू नये.

**कर्क :** उद्योग-व्यवसायात प्राप्ती चांगली राहील. नौकरीच्या ठिकाणी बेफिकिर राहू नये. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावेत. संततीच्या आर्थिक बाबीवर आणि वर्तनाकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांना प्रयत्नाप्रमाणे यश. अविचारी निर्णय टाळावेत. सरकारी कामात विलंब होईल. प्रवासामधून आनंद. वैयक्तिक खर्च वाढतील.

**सिंह :** व्यावसायिक स्थिति चांगली राहील. नौकरीमध्ये मानसिक दडपण जाणवेल. संततीला नौकरीच्या संधी येतील. विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम घ्यावे लागतील. शेजाऱ्यांपासून अलिप्त रहावे. सरकारी कामात अडचणी येतील. डोळ्यांच्या विकारांपासून काळजी घ्यावी. विश्वास ठेऊन व्यवहार टाळावेत. प्रवास लाभदायक.

**कन्या :** उद्योग-व्यवसायात प्राप्ती कमी. जोखीम टाळावी. नौकरीमध्ये समाधानकारक परिणाम. संततीला संसर्गातून त्रास होतील. विद्यार्थ्यांना शुभ परिणाम मिळतील. सरकारी कामात सफलता मिळतील. ओळखीतून वैयक्तिक कार्यात यश. भावंडांच्या बाबतीत समस्या. मित्र-मंडळींकडून अपेक्षित सहकार्य मिळेल.

**तुळ :** व्यावसायिक आर्थिक समस्या उद्भवतील. नौकरीमध्ये वरिष्ठांचे सहकार्य चांगले राहील. संततीच्या कामात अडचणी निर्माण होतील. विद्यार्थ्यांना अपेक्षित सफलता मिळेल. अविचारी खर्च टाळावेत. सरकारी कामात यश मिळेल. प्रवासामधून नियोजित कामे होतील. मित्रांची उत्तम साथ.

**वृश्चिक :** उद्योग-व्यवसायात आवक चांगली राहील. नौकरीमध्ये समाधानकारक घटना. संततीच्या दृष्टिने शुभवार्ता समजतील. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात कार्यपूर्ती होईल. नव्या ओळखीतून लाभ मिळतील. प्रवासामध्ये वस्तूंची काळजी घ्यावी. मित्रांकडून चांगले सहकार्य राहील.

**धनु :** व्यावसायिक प्राप्ती चांगली राहील. आर्थिक जोखीम घेऊ नये. नौकरीमध्ये प्रलोभनांपासून दूर रहावे. संततीला स्थावर खरेदीचे योग येतील. विद्यार्थ्याचा कल मनोरंजनाकडे राहील. सरकारी कामात अडचणी येतील. खाण्या-पिण्यावर पूर्ण नियंत्रण ठेवावे. वाईट संगतीपासून अलिप्त रहावे.

**मकर :** उद्योग-व्यवसायात प्राप्तीत घट. नौकरीमध्ये मनाविरुद्ध घटना घडतील. संततीच्या विवाहासंबंधी कामातून शुभ. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात अडचणी येतील. जुन्या दुखण्यातून त्रास होतील. जोडीदाराला चांगल्या संधी येतील. प्रवासामधून कामे यशस्वी होतील. मित्रांची साथ मिळेल.

**कुंभ :** व्यावसायिक प्राप्ती कमी राहील. नौकरीमध्ये कामाचा ताण जाणवेल. संततीला आर्थिक लाभ मिळतील. विद्यार्थ्यांना चांगले यश मिळेल. खेळाडूंना चांगले यश मिळेल. व्यसनांपासून त्रास होईल. सरकारी कामात बाधा येतील. मित्रांमुळे चांगले फायदे मिळतील.

**मीन :** व्यावसायिक आवक चांगली राहील. नौकरीमध्ये संमिश्र परिणाम मिळतील. संततीच्या बाबतीत शुभ घटना. विद्यार्थ्यांना यशदायी काळ राहील. सरकारी कामे मार्गी लागतील. पोटाचे विकार त्रास देतील. कलाकारांना चांगल्या संधी येतील. प्रवासामधून नियोजित कामात यश.

# जॉब कि ड्युटी..!!

महिनाभर झाला असेल, आमच्या कंपनीत माझ्या शेजारच्या खुर्चीवर नवा मुलगा आला आहे, इम्रान नावाचा! मुलगाच म्हणा, खूप लहान आहे माझ्यापेक्षा, अंदाजे १५ वर्षे लहान असावा ! आमच्या टेक्निकल भाषेत म्हणाल तर माझा सुपर ज्युनियर! हुशार आहे, होतकरू आहे, नुकताच पास आउट झाल्याने नवनवीन शिकण्याची आणि जाणून घेण्याची खूप जिज्ञासा आणि जिद्द आहे. मलाही रोज ''सर, काही शिकवा ना, काही सांगा ना, मलाही मोठे व्हायचं आहे, तुमच्या सारखा जास्त पगार मिळेल मग म्हणून गळ घालत असतो. काही दिवसापूर्वी मला वेळ होता. ठरवलं की चला बोलूया त्याच्याशी. त्याला हाक मारली, म्हंटल, इथे ये. मी काही बोलणार इतक्यात त्याला घरून फोन आला. त्याने पटकन आईला मां, अभी जॉब पे हू म्हणत फोन ठेवला आणि माझ्याकडे वळला. म्हणाला, हा सर, तुम्ही काहीतरी सांगत होतात.

मी स्मितहास्य दिले. तो चक्रावला. त्याने विचारले,

का हसताय सर ? माझे काही चुकले का ?

मी काहीच जास्त बोललो नाही. त्याला फक्त इतकेच सांगितले की कधी जमल्यास मला घरी फोन करताना ऐक. संभाषण संपले. दिवस संपला.

त्यांनतर दोन तीन दिवसानंतर आम्ही दोघे बाजारात घरगुती खरेदीला गेलो. एक लहान मुलगा रस्त्यावर शेंगदाणे विकत होता. आम्ही गेलो, मी त्या लहान मुलाला म्हणालो, राजू, दो पॅकेट दे. इनसे मील, ये नये साहब है. त्याने माझ्या ज्युनियरकडे बघितले, हसला आणि आम्हाला दोन पाकिटे शेंगदाणे दिलें. मी त्याला त्याचे वीस रुपये दिले.

इम्रानला विलक्षण वाटले, तो बोललाच, सर, तुम्हाला या शेंगदाणे विकणाऱ्याचे नांव देखील माहीत आहे, कमाल आहे ! तुम्ही तर क्वचित येता बाजारात ! मी फक्त हसलो.

इम्रान जायला वळला तेवढ्यात मी त्या राजूला विचारले, राजू, मां किधर है ?

राजू म्हणाला, आज धूप है ना, वो देखो, वो पेड के नीचे है। त्याने थोड्या दूरवर एका झाडापाशी बोट दाखवले.

मी जायला निघालो. इम्रान चक्रावला. मी त्याला डोळ्याने सांगितले, चल.

झाडापाशी गेलो. तिथे एक बाई फाटक्या कपड्यात बसलेली होती. हातात शेंगदाणे होते. हातात कमी आणि खालीच जास्त पडलेले होते. ती शून्यात पाहत होती.

मी खिश्यातून एक नोट काढली, हातातल्या शेंगदाण्याच्या पुडीत टाकली आणि त्या मातेच्या डोक्यावर हात ठेवला.

ती दचकली. मी तिला शेंगदाणे ऑफर केले. तिने ते अक्षरशः हिसकावले आणि अध्याश्यासारखे खाऊ लागली, काही टरफले सोडून तर काही सालीसकट ! इम्रान तिला अडवणार इतक्यात मी त्याला परत जाण्याचा इशारा केला.

निघालो!

इम्रान काही मला विचारणारच होता तितक्यात मी त्याच्या मनातले ओळखून म्हणालो,

आई आहे त्याची, वेडी आहे. तिला स्वतःचे भान नाही. तिला इथे बसवून तिथे शेंगदाणे विकतो तो.

जायला निघालो. इम्रान म्हणाला, सर मी तुम्हाला बोलताना ऐकले सर. तुम्ही जॉबच्या ऐवजी ड्यूटी म्हणता !

मग काय समजले तुला ? - मी विचारले.

जॉब म्हणजे काम आणि ड्यूटी म्हणजे कर्तव्य सर - तो म्हणाला.

मी हसलो आणि त्याला विचारले. मग मला सांग, तो राजू आणि ती त्याची आहे ते काय आहे ? यात त्याचा जॉब कोणता आणि त्याची ड्यूटी कोणती?

सोपे आहे सर. शेंगदाणे विकणे त्याचा जॉब आहे आणि आईला सांभाळणे त्याची ड्यूटी आहे - तो म्हणाला.

मी म्हणालो, नाही! त्याला आईला मेहनत करून सांभाळायचे आहे, त्यासाठी तो आईला सुखरूप ठेवून एकटा शेंगदाणे विकत आहे, ही त्याची ड्यूटी आहे, आईसाठी केलेली ! जॉब असता तर आईला सोबत घेऊन बसला असता, लोकांनी सहानुभूतीने जास्त पैसे आणि भीक दिली असती त्याला ! ड्युटी म्हणजे तपश्चर्या असते लक्षात ठेव !

पण तुम्ही पण पैसे दिले की सर आईला ? ते काय होते मग ? त्याचे प्रश्न संपले नव्हते.

अरे खूप दिवसांनी एका आईला भेटलो, मुलाने थोडे पैसे ठेवले हातात इतकचं ! मी स्मितहास्य करत सांगितले. नाहीतर राजूलाच दिले नसते का ?


इम्रानच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसली मला ! अगदी समाधानाने चालायला लागला. मला म्हणाला, सर खूप शिकायला मिळाले. थँक्यू !

मी त्याला इतकचं म्हणालो, लक्षात ठेव, नुसते जॉब करणाऱ्यांचा फक्त पगार आणि हुद्दा लक्षात राहतो आणि ड्यूटी करणाऱ्यांचे नांव आणि काम लक्षात ठेवले जाते ! आणि हो, थँक्यू नको कारण तुला शिकवणे माझा जॉब आहे आणि तुला काहीतरी चांगले शिकवणे माझी ड्यूटी आहे रपव I was just doing my duty....... !

# मॅडम...एवढं कराल

आदरणीय मॅडम, महिला दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! करत असते मी प्रयत्न...माझ्या मुलीला याविषयी बरंच काही सांगण्याचा- पण पंख पसरून पिलू उडतंय आता घरट्याबाहेर ... प्राध्यापिका म्हणून तुम्ही अगदी प्रिय आहात विद्यार्थ्यांमध्ये प्रभाव आहे तुमचा माझ्या मुलीवरही...म्हणून हे पत्रं! आणि तसंही... आईचं मन...तेही 'मुलीच्या'... कुठे स्वस्थ बसू देतं कुणाला सध्या! मॅडम, सगळीच 'माणसं' स्त्रियांना सन्मानानं वागवणारी नसतात, नसतात सगळीच त्यांना समान दृष्टीनं बघणारी... हे शिकेलच माझी मुलगी कधी ना कधी. मात्र तिला हे देखील शिकवा-सभोवतालच्या वाईट बातम्यांमुळे खचून जाऊ नकोस म्हणावं... कोवळ्या कळ्यांना चिरडून टाकणारे नराधम आहेत इथे... पण त्याही पेक्षा जास्त आहेत पाणावलेल्या डोळ्यांनी कन्येच्या पायांवर नतमस्तक होणारे, तिच्या पंखांमधे बळ देत तिला मोकळं आकाश दाखवणारे पुरुषोत्तमही...कितीतरी रूपांमध्ये! स्वतःच्या मुलींना गर्भातच मारणारे काही क्रूर मायबाप आहेत .. पण 'मुलगी झाली' हे सौभाग्य समजून तिचं अभिमानानं पालन-पोषण करणारे समर्पित आई- बाबा आणि कुटुंबीयही आहेत! मित्राच्या रूपात टपून बसलेले संधीसाधू आहेत... तसेच पार्टीनंतर आपल्या मैत्रिणीला जबाबदारीनं..सुखरूप घरी पोचवणारे... प्रसंगी तिला खंबीर करणारे... नि:स्वार्थी जिवलग मित्रसुद्धा आहेत! तिला शिकवा- स्त्रीचं सामर्थ्य कशात आहे खरं - म्हणजे तिचे जय-पराजय ती स्वतःच ठरवू शकेल! तिला द्वेष, मत्सरापासून दूर राहायला शिकवा...आणि नको विश्वास ठेवू म्हणावं 'स्त्रीच स्त्रीची वैरी असते' यावर- आवश्यक असेल तिथे शस्त्रे सोडून मोकळेपणानं घेतली पाहिजे मदत तिनं ... आणि स्वतःबरोबर दिला पाहिजे भक्कम आधार इतर मैत्रिणींना सुद्धा! गुंडांना भीत जाऊ नकोस म्हणावं- त्यांना नमवणं तसं अवघड वाटतं, पण अशक्य नाही! त्यासाठी शरीराचं सामर्थ्य तर तिनं वाढवावंच पण शिकावं 'माणसं' ओळखायलाही. सतर्क रहावं चहू बाजूंनी... रेंगाळू नये मोहाच्या भुलवणाऱ्या आणि कुठेही न नेणाऱ्या वाटांवर! प्रसंगी सामोरी जावं धैर्यानं...उपजत बुद्धिचातुर्यानं... आणि भस्मसात करावेत दुर्जनांचे मनोदय...स्वतःच्या आत्मबळावर! जमेल तसं दाखवत चला तिला... आपल्या संस्कृतीचं, इतिहासाचं अद्भुत वैभव! आवर्जून सांगा तिला - अनेक कर्तृत्त्ववतींनी आपापल्या क्षेत्रामधे जगभरात लढलेल्या लढाया... ...आणि केलेलं समर्पण, दिलेलं योगदान! जाणवू द्या तिला महत्त्व - त्यांनी आपल्यासाठी निर्माण केलेल्या वाटांचं आणि मोल त्यांच्या संघर्षाचं! मॅडम,आणखीन एक महत्त्वाचं- झुंजू दे तिला तिच्या आघाड्यांवर समर्थपणे, स्वतंत्रपणे, अविरत ...मात्र त्याबरोबरच मिळू दे तिच्या स्त्री-मनाला निवांतपणा... थोडं विसावत घेऊ दे हिंदोळे तिला...बागडू दे स्वच्छंदपणे... भटकू दे तिची पावलं वेडी होऊन... सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला! आणि हेही जाणवू दे हळूवार - किमया निसर्गाची अद्भुत... कशी दडली आहे तिच्याच शरीरात! साऱ्या न्यूनगंडांवर मात करून प्रेम करावं तिनं स्वतःवर... अगदी भरभरून. ...आणि करावा सन्मान स्वतःच्या अनमोल शरीराचा,मनाचा...अस्तित्वाचाच! तिला हेही आवर्जून सांगा - सगळ्या वादळांवर मात करणारी नात्यांची ऊब खूप मोलाची असते आयुष्यात! पण...प्रत्येकच स्त्रीनं हेही लक्षात ठेवावं - जर खेळू लागली आपलीच माणसं द्यूत तिला पणाला लावून...तर मात्र वेळीच 'जागं' होऊन तिनं निवडायला हवा स्वतःचा मार्ग...अपूर्व हिंमतीनं! माझ्या मुलीला हे समजवता आलं तर बघा मॅडम - जिकडे सरशी तिकडे धावत सुटणाऱ्या अंतहीन 'फॅशन' च्या भाऊगर्दीत सामील न होण्याची ताकद तिनं कमवायला हवी. आधुनिकता फक्त पेहरावात नसते, तर ती असते विचारात, त्याप्रमाणे वागण्यात! म्हणून वेळ पडली तर बदलून टाकावीत तिनं - तथाकथित अधुनिकतेची परिमाणंच...घालून नवा पायंडा! आणि हो- जे स्वतःला हवंय ते आधी दुसऱ्यांना द्यायला शिकावं तिनं- आनंद,आदर, प्रेम, क्षमा...अगदी 'space' सुद्धा! जमलं तर तिच्या मनावर बिंबवा मॅडम - स्त्री- पुरुष मानतेचा खरा अर्थ! पुरुषांशी स्पर्धा करणं... अत्यावश्यक नाही स्वतःला सिद्ध करण्यासाठी. पुरुषांच्या शिव्या, सवयी, व्यसनं यांची बरोबरी करण्यात कसली आली समानता? स्वतःला व्यापक करत तिनं जावं स्त्री -पुरुष तुलनेच्या कितीतरी पलीकडे ... कारण ही तुलना म्हणजे मुळात एक 'चाकोरीच'!काढावी मोडून तिनं ती चाकोरी आणि रचावे नवीन मापदंड! कोणतेही पूर्वग्रह न ठेवता न्यायबुद्धीनं वागावं तिनं सगळ्याच पुरुषांशी आणि ठेवावी नितांत श्रद्धा उदात्त मानवजातीवर...!

अजून एक विचार रुजवा तिच्यात - नेहमी 'माणूस' म्हणून बघावं तिनं स्वतःकडे ...तुलना करावी कालच्या आणि आजच्या तिच्याशीच, स्वतःला शोधत रहावं. खूप मेहनतीनं पुढे जात रहावं...तेही आपल्याच स्वतंत्र लयीत! आयुष्यात मिळालेल्या प्रत्येक संधीचं करावं सोनं... ठरवावं तिचं क्षेत्र तिनं स्वतःला चांगलं ओळखून...अगदी आतून! हेच बघाना - आपली आयुष्यभराची उपासना ओंजळीत घेऊन एखादी नृत्यांगना साता समुद्रापार संस्कृतीचा दूत होते... तर एखादी रणरागिणी राष्ट्राच्या सीमेवरती शत्रूवर काळ होऊन बरसते...! कुणी अंतराळात जाते तर कुणी मुलांना घडवण्यात रमते! ....वो हर




रूप में 'जीवन' हैं!

मॅडम, हेही कोरलं जाऊ दे तिच्या मनावर - भावनेच्या भरात नव्हे तर विवेकानं घ्यावेत तिनं आयुष्यातले सगळे निर्णय आणि हो...घ्यावी संपूर्ण जबाबदारी सुद्धा त्या निर्णयांची हिंमतीनं...तरंच त्या 'स्वातंत्र्याला' काही अर्थ आहे! घडवावं उंच कर्तृत्त्व तिनं...स्वतःचं कौशल्य, बुद्धी विकून पण कधीही विक्रय करू नये...हृदयाचा, आत्म्याचा...! लागू नये धक्का कधीच... तिच्या आत्मसन्मानाला. जे सत्य आणि न्याय वाटतं त्याच्यासाठी निश्चयानं पाय रोवून तिनं लढावं...अथकपणे... स्वत:वरचा विश्वास यत्किंचितही ढळू न देता!

मॅडम, आणखीन एक विनंती- तिला ममतेनं वागवा, पण लाडावून ठेऊ नका. सदैव तिचा हात धरून चालवू नका तिला...लागू दे थोड्या ठेचा,चाखू दे चव थोडी वेदनांची. तयार होऊ दे तिला स्वतःच्या अनुभवातून जग बघण्यासाठी...त्याला आत्मविश्वासानं सामोरं जाण्यासाठी! ताऊन सुलाखून निघू दे तिला-कारण न जाणो कोणत्या वळणावर... एखादी अग्निपरीक्षा आजही द्यावी लागेल... तिला एकटीला!तिचं धैर्य डगमगता कामा नये कुठेही! मॅडम तुम्ही या विचारात असाल... की एवढं सगळं मुलींना सांगायचं...! पण मुलांना कायकाय आणि कसं सांगावं? खरंय तुमचं...मुलांना वाढवण्याची जबाबदारी तितकीच मोठी आहे. आवर्जून सांगितलं पाहिजे मुलांना- स्त्रीलाही समजा एक 'माणूसच'...तुमच्यासारखं मन, शरीर, भावभावना, स्वप्नं, आकांक्षा.. सगळं तस्संच असतं म्हणा अगदी तिच्यातही! जितकं जाणून घ्याल तितकी खोल आणि व्यापक अशी गवसेल ती तुम्हांला -अगदी कोणत्याही रूपात! कळकळीनं सांगा त्यांना - त्वरित थांबवा तिच्यावरचे अपमानास्पद विनोद आणि शरीराबद्दलच्या भयंकर... असह्य गोष्टी... ज्याचं अक्षरशः थैमान सुरु आहे सगळीकडे! करा संकल्प- कोणत्याही स्वरूपात स्त्रीचा अवमान करणार नाही आणि करूही देणार नाही...कुणालाही! जे जे शक्य ते ते सगळं करेन तत्परतेनं - तिच्या सन्मानासाठी. तोच खरा पुरुषार्थ! माफ करा मॅडम, मी फार बोलते आहे-खूप काही मागते आहे- पण पहा - जमेल तेवढं अवश्य कराच, माझी रेवा - खूपच गोड आणि मनस्वी मुलगी आहे हो ती! आणि मला खूप आशा आहेत मुलांकडूनही ... खरा 'पुरुषार्थ' नक्कीच जाणतील ती!

**- मेजर मोहिनी गर्गे- कुलकर्णी (नि.)**

(अब्राहाम लिंकन यांच्या 'हेडमास्तरांस पत्र' या संकल्पनेचा आधार घेऊन!)



# पॉटलक....

जुईला अलीकडेच प्रमोशन मिळालं होतं. तिचा पगार वाढला. स्वतःची स्वतंत्र छोटीशी केबिन मिळाली. इतकी वर्षे अथकपणे केलेल्या परिश्रमाचं चीज झालं ! आनंदात होती. आनंद अनेकांना वाटला, त्यात इतरांनाही सहभागी करून घेतलं की तो शतपटीने वाढतो असं आई नेहमीच म्हणते ! दुःख टाकावं गिळून आणि आनंद टाकावा वाटून ! जागतिक महिला दिन जवळ आला होता. यंदा ऑफिसमध्ये पॉटलक थीम ठेवली होती. प्रत्येकीने एकेक पदार्थ आणायचा आणि लंचच्या वेळी सर्व पदार्थ वाढून घेऊन अंगतपंगत करून जेवायचं. जुईच्या डोक्यात ब-याच दिवसांपासून एक विचार घोळत होता. ऑफिसमध्ये काहीजणींना कदाचित तिचे मत फारसे पटले, रुचले नसते. म्हणून तिने स्वतः पुरताच तो अंमलात आणायचा ठरवला. तिच्या सोसायटीतल्या साळवी काकींनी अलिकडेच पोळीभाजीचे डबे आणि विविध खाद्यपदार्थ ऑर्डरनुसार बनवून देण्याचा छोटासा व्यवसाय सुरू केला होता. साळवी काकांची नोकरी सुटली होती. पैशाची गरज होती.

काकू, तुम्ही मला पुरणपोळ्या करून द्याल का ? मला ऑफिसमध्ये न्यायला हव्या आहेत. पंचेचाळीस लागतील.

हो. देईन की. मी इतक्या मोठ्या प्रमाणात केल्या नाहीत अजूनपर्यंत. पण छान करून देईन मी. काकी आत्मविश्वासाने म्हणाल्या. त्यांचा तो आत्मविश्वास, जिद्द पाहून आदर, कौतुक वाटलं जुईला.

साळवी काकींना ऑर्डर दिलीस ? आपल्या इथे उत्तम पुरणपोळ्या करून देणा-या आहेत की दोघी तिघी. साळवी काकींना कितपत जमतील कुठे माहित्ये ! आणि तुमच्या इथे काहीतरी वीस पंचवीस लेडीज आहेत ना सगळ्या मिळून ? मग पंचेचाळीस पोळ्या कशाला ? बाकीचे पण पदार्थ आहेत ना ? प्रत्येक बाई एकेक पुरणपोळीच घेईल. पंचवीस जणी आहेत. फारतर तीसेक पुरणपोळ्या सांगायच्यास ना. पंचेचाळीस ?

केदार, साळवी काकींना सध्या खूप गरज आहे पैशाची. आणि त्यांनी कॉन्फिडन्टली सांगितलं मला, करून देईन म्हणून. करतील त्या. आणि जास्तीच्या पोळ्या म्हणशील तर ......तुला सांगेन नंतर काय ते.

पॉटलक थीम कमालीची यशस्वी झाली ! धमाल आली ! सर्वच पदार्थ अफलातून, झकास होते ! जुईने नेलेल्या रेशमासारख्या मऊसूत , घास घेतल्याबरोबर विरघळणा-या रुचकर पुरणपोळ्या सर्वचजणींना कायच्या काय आवडल्या ! भरपूर पदार्थ झाल्याने ते सगळ्यांनी घरी न्यायचे, रात्री स्वैपाक करायचाच नाही असं ठरवलं .

लंच झाल्यावर ऑफिस बिल्डिंगमधील सर्व झाडूवाल्या बायकांना जुईने बोलावले. सर्वजणी लेपींीरलीं लरीळी वर काम करणा-या. एकेक करून सर्व पंधराजणी आल्या. जुईने प्रत्येकीच्या हातात नवाकोरा लंचबॉक्स ठेवला. उघडून पहायला सांगितलं. प्रत्येक डब्यात भरपूर साजूक तूप घातलेली एकेक रेशमी पुरणपोळी.

आज जागतिक महिला दिन आहे. आणि अलिकडेच मला प्रमोशन मिळालंय. म्हणून मी तुमच्यासोबत आज माझा आनंद साजरा करतेय. तुम्हाला सगळ्यांना महिलादिनाच्या शुभेच्छा. मलासुद्धा तुमचे आशीर्वाद आणि शुभेच्छा हव्या आहेत.

त्यांच्या चेह-यावरचा आनंद, कृतज्ञतेचा भाव पाहून जुई हरखून गेली.

मॅडम, तुम्ही आमची आठवण ठेवलीत ! कधी कधी दोन- दोन तीन- तीन महिने ठेकेदार आमचा पगार देत नाही. कायम पैशाची चणचण असते. आज तुम्ही आम्हाला बरोबरीच्या नात्याने मान दिलात ! लई भारी वाटलं ! आमच दुवा कायम आहे तुम्हाला. सगळं छान होईल बघा तुमचं.

दहा पंधरा दिवसांनी जुई नेहमीप्रमाणे सकाळी लवकर पोळीभाजीचा डबा घेण्यासाठी साळवी काकींकडे गेली.

गं जुई. तू सगळीकडे तोंड भरून कौतुक केलंस माझ्या पुरणपोळ्यांचं. मग आपल्या सोसायटीतच पुरणपोळीच्या दोन मोठ्ठ्या ी-वशीी मिळाल्या मला. बर्थ डे पार्टी वगैरेच्या ीवशीी पण येऊ लागल्या आहेत.

काकी, अहो मग ींहरपज्ञ्रीं कशाला म्हणताय ! तुमच्या हाताला छान चव आहे. म्हणून ीवशीी मिळू लागल्यात. अभिनंदन!

जुई, सगळेच दाद देणारे, कौतुक करणारे नसतात गं. तू माझी भरपूर जाहिरात केलीस ! खूप प्रगती करशील. मोठ्या मनाची आहेस. माझे आशीर्वाद आहेत तुला ! thanks काकी! जुई किंचित हसली आणि डबा घेऊन बाहेर पडली. यंदाचा महिला दिन तिच्या कायम लक्षात रहाणार होता

**-रश्मी साठे**

# शब्दझुला

## सुंदरता मनाची

जाते तनामनास प्रसन्न करुन
घेता ओंजळीत फुले मोगऱ्याची
असतात काही माणसं ही अशीच
प्रेमाची
असे सहवास अमृताची गोडी ज्याची
पाहताक्षणीच आवडतात लगेच
बघता बघता जातात होऊन आपली
पाहिले मनात उतरुन जर त्यांच्या
असतात अलवार रेशमी स्वभावाच्या
वाटे हवीहवीशी संगत अशा व्यक्तींची
अशाच गोड विनयाने वागणाऱ्यांची
जपा प्रेमाने जीवापाड अशी माणसे
पडद्याआड जाण्यापूर्वीच..
सुंदर रेशमी स्वभावाच्या माणसाचीच
असे कमाई हीच आयुष्यात
जाते सुंदरता संपून वयानुसार शरीराची
आठवणीत रहाते सुंदरता
मनाची..मनाची ..मनाची..

**-मुकुंद लाहोटी,**
९९७५२४७५००

## काळ पुर्वीचा

पुर्वीचा काळ बाबा
खूपच होता भारी,
प्रेमळ, मायाळू अशी
नाती होती सारी.
कुटुंब जरी होते मोठे
एकच होता तो कारभारी,
माणसं होती आज्ञाधारक
गुण्यागोविंदाने नांदणारी.
घरांच घरपण जपण्यासाठी
दारं सताड उघडी असायची,
कार्य भले कोणतेही असो
भावकी एकत्रित दिसायची.
दिवस जसे गेले बदलत
बदलत गेली सारी माणसं,
जशी गेली उडून पाखरे
मोकळी उरली फक्त कणसं.
जसे भाव वाढले गुठ्यांचे
बदलत गेले स्वभाव मनाचे,
नातीगोती गेली तुटत सारी
बनलो आम्ही पुजारी धनाचे.
गतकाळ असा काही सरला
हल्ली भाऊ भावाचा न उरला,
दारे घराची झाली सारी बंद
दुजाभाव मनामनात कोरला.

**-शिवाजी द. जाधव,**
राजगड, पुणे

# संघर्ष

आयुष्यात किती पुढे गेलो हे महत्वाचं असतंच पण काय परिस्थितीतून पुढे गेलो हे जास्त महत्वाचं असत .सुखासुखी सगळं असताना कित्येक जण पुढे जातात हे चांगलच आहे .मग त्या महिला असू देत त्यांना घरातून ींींीीं ींीशा असेल ,त्यांचा ींळिलरश्र सासू चा जाच नसेल .मुख्य म्हणजे पतीचाही पाठिंबा असेल तर त्यांची संघर्षाची पायवाट सुखकारक असते .मग पुढे त्या यशस्वी उद्योजिका होतात .समाज पण त्यांना हार घालतो .पण काही महिलांना कोणाचाही पाठिंबा नसतो ,जबाबदारीच ओझ ,शारीरिक किंवा मानसिक आजार ,पतीचाही विरोध इतकं असूनही जर त्या भलेही समाजाच्या नजरेत आर्थिक स्तरावर वंचित असतील तरीही माझ्या नजरेत त्याच जास्त यशस्वी आहेत ,असतील.कारण समुद्राच्या लाटा जेव्हा आपले पाय खेचत असतील तेव्हा तुम्ही उभे राहिलात ,प्रयत्न केला हेच यश असते .कितीतरी महिला मुंबईत किंवा इतरही ठिकाणी श्रेलरश्र मध्ये प्रवास करतात .तेथेच भाजी निवडतात .परत घरी येऊन पती परमेश्वरासाठी सगळे हातात देतात .पुन्हा स्वयपाक असतो .ह्या सगळ्या यशस्वी आहेतच .भलेही त्या उद्योजिका नसतील तरी त्या हिरकणी आहेत .म्हणूनच कुणी महिला पुढे गेली तर इतर महिलांनी किंवा त्यांच्या कुटूंबातील सदस्यआणि समाजानेही त्यांना मान दिला पाहिजे .फालतूचे ीशश्री बनवण्यापेक्षा यांच्या मुलाखती घ्या .त्यांचे संघर्ष लोकांपर्यंत पोचून अजून चार जणी त्यातून प्रेरणा घेतील . किंवा ज्यांना सगळं असून फक्त नकारात्मक गोष्टींकडे बघण्याचा कल असतो .त्यांचेही विचार बदलतील .आणि इथे आपण चार दिवस राहणार आहोत तेव्हाही आपण इतरांना आपल्याबद्दल काय वाटत? याचा विचार करत बसलो .तर आयुष्य जगलो कधी ?ह्याचे उत्तर आपल्याला मिळणार नाही म्हणूनच आपला संघर्ष वेगळा होता ,आपली पायवाट किती कठीण होती त्यातून आपण थोडस का होईना करतोय ह्याच मूल्यमापन आपण करायचं .आणि स्वतःला कमी नाही समजायचं .महिला घरकाम करतात म्हणजे त्या आधार स्तंभ असतात .त्या संस्कार मुलावर करतात .दिवसभर तुम्ही काय करता ?झोप काढता ?हे हि सुनावणारे महाभाग असतात .यांचा संघर्ष त्यांना दिसत नाही .महिलांनी कितीही त्याग केला तरी तेच त्यांचं जीवन आहे .असे बुरसटलेले विचार जिथे असतील तेथे चकूनही मुलींना लग्न करून पाठवू नका .कारण तिला तिथे जन्मभर संघर्ष करावा लागेल . तिच्या हक्कांसाठी ती उभी राहील इतकी आत्मनिर्भर तिला बनवा . आज जे काही तुम्ही असाल त्याला तुम्ही स्वतःला मान द्या .मग इतरांनी न देवो .अपेक्षाही ठेवू नका. आपला संघर्ष फक्त आपल्याला माहित असतो .हे लक्षात ठेवा .कधीतरी स्वतःसाठी कौतुकाची टाळी वाजवा .

**-माधुरी पळणिटकर.**

**आपला महाराष्ट्र**
**वाचकांना विनम्र सुचना**

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

# नवापूर नगरपरिषदेत महिला दिन उत्साहात साजरा

**नवापूर, दि.९ (प्रतिनिधी) – नगरपरिषद दीनदयाळ अंत्योदय योजना व महिला व बालकल्याण विभाग यांच्या संयोगाने शहरातील महिला बचत गटांच्या सभासदांचा मेळावा संपन्न झाला.**

या मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून प्रा.श्रीमती नीलिमा नितीन माळी उपस्थित होत्या. तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी स्वप्नील मुधलवाडकर, लेखाधिकारी राहुल पिंगळे, प्रशासकीव अधिकारी नाथीराम देसाई, प्रकल्प अधिकारी प्रशांत भट, समुदाय संघटक श्रीमती मीनाक्षी वळवी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. मुख्याधिकारी स्वप्नील मुधलवाडकर यांनी महिलांनी संघटित होऊन काम करावे स्वतःच्या पायावर उभे राहावे असे आवाहन केले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबंधितांना प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन– तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे येथील सर्वे नं.५९/२ पैकी प्लॉट नं.९ब चे क्षेत्र १०५ चौ.मी. पैकी यासी चतु:सिमा–

पुर्वेस– रोड, पश्चिमेस– सर्वे नं.५९/१, दक्षिणेस– सर्वे नं.४४, उत्तरेस– प्लॉट नं.९अ.

वर नमूद चतु:सिमांकित मिळकत ही निर्मला जिभाऊ अहिरे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील आहे. सदर मिळकतींचे पुर्वीचे मालक अशोक भाईदास पाटील, आशा वसंत पाटील आणि लीलाबाई भाऊसाहेब सावंत यांचेत झालेले मुळ/अस्सल रजि. खरेदीखत दि.१५/१/२००९ रोजीचे हे गहाळ, झाले, हरविले आहे.

तरी सदर निर्मला जिभाऊ अहिरे हे वर नमूद मिळकत हे पिरॅमल कॅपिटल अॅन्ड हाउसिंग फायनान्स कं. यांचेकडून कर्ज घेत असून सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कुठल्याही प्रकारची हरकत किंवा सदर मिळकत ही खाजगी, सरकारी, निमसरकारी वित्तीय संस्था, बँक, सोसायटी इ. कडे गहाण असल्यास सदर नोटीस वर्तमापत्रात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदपत्रांसह प्रत्यक्ष लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्बोज व निर्वेध्य समजण्यात येईल.

नोटीस देणार, निर्मला जिभाऊ अहिरे

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती, दस्तऐवज, अधिकारावरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे, दि.०९/०३/२०२४.

**अॅड.सागर पी.सोनवणे**
४, शिव कॉलनी, मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे.
**मो.नं.९४२०३७३५३०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे वलवाडी धुळे म. न.पा.हद्दीतील स. नं. २४/१/अ/१/अ/१/ब/२ पैकी प्लॉट नं. ६१ चे एकूण क्षेत्र१ ५५ चौ. मी. असा बखळ प्लॉट/मिळकत तुम्हांस कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो माझे मालकीचा बखळ प्लॉट ची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रकाणे.

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट/मिळकत ही श्री. शरद हरचंद देवरे रा. काल्हेर ता. भिवंडी जि. ठाणे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे ताबे उपभोगातील आहे. सदरचे बखळ प्लॉट/मिळकत आमचे आशिल श्री. यशवंत दगाजी पाटील रा. निमडाळे ता. जि. धुळे यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे. सबब आमचे आशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, कर्ज, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी.परस्पर वर्तमान पत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील बखळ प्लॉट/मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे आशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत दिली असे.

धुळे दि. ०९/०३/२०२४

**अॅड.लखमीचंद अ. गुजर**
अॅडव्होकेट व नोटरी
ग.नं.२, घर नं. ३३२६. मुल्लावाडा, धुळे मो. नं. ९४२३४९३०८९

## पाहिजेत

आमच्या जवाहर शेतकरी सहकारी सूत गिरणी लि. धुळे या संस्थेत खालीलप्रमाणे उमेदवारांची पदे त्वरीत भरावयाची आहेत

| अ.नं. | पदाचे नांव | शिक्षण | अनुभव | वयोमर्यादा | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकौंटस् असिस्टंट (मुले/मुली) | B.Com/M.Com. MSCIT/Tally/Eng-Marathi Typing | फ्रेशर | २१–२५ वर्षे | ५ |
| २ | अकौंटट (स्त्री/पुरूष) | B.Com./M.Com MSCIT/Tally | अकौंटस् कामाचा ४–५ वर्षाचा अनुभव | २५–३० वर्षे | ३ |
| ३ | जनरल मॅनेजर (अकौंटस् फायनान्स कमर्शियल) | CA/ICWA/CA Inter | अकौंटस् कामाचा १० वर्षाचा अनुभव | ३०–४५ वर्षे | १ |

इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी अनुभव व कागदपत्रांसह दि.१४/०३/२०२४ रोजी सकाळी ११ वाजेपासून सूत गिरणीच्या कार्यालयात स्वखर्चाने उपस्थित राहवे.

(व्ही.सी.ठाकरे) कार्यकारी संचालक — (प्रमोद जैन) व्ही.चेअरमन — (आ.कुणाल पाटील) चेअरमन

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो., यांचे न्यायालयात**

अर्ज नं./२०२४

भरत सुकलाल कोळी (जाधव),
रा.वाघाडी, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

म.ग्रामविकास अधिकारी सो.,
ग्रामपंचायत वाघाडी, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदाराचा जन्म दि. २०/०१/१९७९ रोजी मौजे वाघाडी, ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाल्यामुळे जन्म नोंद होवून जन्म दाखले मिळणेबाबत अर्जदार हिने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास १० दिवसांच्या आत स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. ४/३/२०२४ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिले असे.

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** तहसिल कार्यालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) **वरीष्ठ अधिक्षक** तहसिल कार्यालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो., शिरपूर यांचे न्यायालयात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२४

मक्सूदबेग हारूनबेग मिर्झा, उ.व.२९, धंदा– व्यापार,
रा.इदगाह नगर, शिरपूर, ता.शिरपूर. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

म.मुख्याधिकारी सो.,
शिरपूर वरवाडे नगर परिषद, शिरपूर,
ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो शिरपूर यांचे न्यायालयात अर्जदार असिफ बेग हनीफ बेग याचा जन्म दिनांक ०१/१२/१९९४ रोजी मौजे शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे येथे जन्म झाले बाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत अर्ज दाखल करीत आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी पंधरा दिवसात स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

सदर नोटीस आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

**अॅड.संजय दिनानाथ सानफ**
कॉलेज रोड, कोर्टाच्या गेट समोर, शिरपूर, जि.धुळे. पिन–४२५४०५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, सोसायटी यांना या जाहीर नोटीसीने आमचे पक्षकार यांचे तर्फे अॅड. बाळासाहेब अ. पवार रा. धुळे यांचे मार्फत कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार मे डीसीबी बँक शाखा नाशिक यांनी मौजे धुळे ता. जि. धुळे येथील व धुळे महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचे सातबारा उतारानुसार वर्णन मौजे धुळे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नंबर ५३०/२ पैकी प्लॉट नंबर ३७ यास एकूण क्षेत्र ३०६ चौरस मिटर (३२९२.५६ चौरस फूट) पैकी उत्तरेकडील क्षेत्र १०४५ चौरस फूट (९०.४५ चौरस मीटर) याच मिळकीचे सिटी सर्व्हे उतारानुसार वर्णन मौजे धुळे ता. जि. धुळे येथील सिटी सर्व्हे नंबर ५१२४ यास एकूण क्षेत्र २९१.४० चौरस मीटर पैकी उत्तरेकडील क्षेत्र ९०.४५ चौरस मीटर यावरील आर. सी. सी. बांधकाम क्षेत्र ६४.४२ चौरस मिटर ही मिळकत :श्री. स्वप्निल प्रभाकर अहिरराव रा. ता. जि. नाशिक यांचे मालकीची असून त्यांना सदर मिळकत तारण ठेवून रक्कम रु. १८,६०,३६०.८७ कर्ज मंजूर केलेले आहे. परंतु सदर मिळकतीचे लिंक ओरिजीनल खरेदीखत नंबर ९०२/१९९३ दिनांक २७.०४.१९९३ पार्वताबाई अर्जुन सोनवणे व श्री. भिमराव राजाराम बाविस्कर यांचेत झालेले हे श्री. स्वप्निल प्रभाकर अहिरराव यांचेकडून हरविले असल्याचे कारणाने मिळालेले नाही. त्याबाबत त्यांनी धुळे शहर पो. स्टे. ला ऑनलाईन एफ.आय.आर. दाखल केलेली आहे. ते सदर मिळकतीचे गहाणखत हे डीसीबी बँक शाखा नाशिक यांचे लाभात करून देणार आहेत.

उपरोक्त मिळकतीवर कोणाचीही हरकत, घेणे, सौदा पावती, कोणत्याही बँकेचे वित्तीय संस्थेचे कर्ज, गहाण, तारण, कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचे पत्त्यावर स्वत: भेटून लेखी मुळ कागदपत्रासह हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेलया व लेखी मुळ कागदपत्रांसह न आलेल्या हरकती आमचे पक्षकाराव बंधनकारक राहणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही. मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची व कोणाचीही कोणत्याही हितसंबंध नाही असे गृहीत धरण्यात येईल तसेच परस्पर वर्तमान पत्राद्वारे घेतलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व कागदपत्र, अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०९/०३/२०२४

**अॅड. बाळासाहेब अ. पवार**
पत्ता : फ्लॅट नंबर २०५, साई आनंद ग्रिन टॉप अपार्टमेंट गिता नगर देवपूर, धुळे
**मो.९४२३२३२९०४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे सावेर ता. शिरपूर जि. धुळे येथील गट नं. ४३ चे क्षेत्र ला. ला. ० हे. २५ आर.+ पो. ख. ० हे. ०२ आर. एकूण ० हे. २७ आर. आकार ० रु. ६५ पैसे जिराईत शेतजमीन. सदर शेतात जाण्यास वापर रस्ता जुन्या वहिवाटीप्रमाण आहे.

यासी चतु:सिमा खालील प्रमाणे

पुर्वेस : गट नं. ३९ पश्चिमेस : गट नं. ४२
दक्षिणेस : चोपडा शिरपूर रस्ता उत्तरेस : गट नं. ३९

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे आशिल यांनी मिळकतीचे मालक श्री. दुधा हिरा वंजारी (पवार) व श्री. रणछोड हिरा वंजारी (पवार) दोघे रा. मु. पो. सावेर ता. शिरपूर जि. धुळे यांचेशी केला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती,खरेदी–विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी सौदा करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा सौदापावतीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.धुळे दि. ०९/०३/२०२४

**अॅड. रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
**मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो., कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

निशाणी नं.
दिवाणी किरकोळ अर्ज नं.१३७/२०२४

१) श्रीमती सुनिता सुरेश मोरे, २) श्रीमती कल्याणी पंकज मोरे लग्नानंतरचे नाव उर्फ कल्याणी भिकाजी जाधव, लग्नापूर्वीचे नाव
३) कु.श्रुती पंकज मोरे, सर्व रा.७४, सुभाष कॉलनी, शिरपूर,
ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**
कै.पंकज सुरेश मोरे, मृत्यू दि.१४/०१/२०२४
रा.सुभाष कॉलनी, शिरपूर, जि.धुळे. ..... **मयत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणे येते की,

अर्जदार याने म.दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, शिरपूर यांचे कोर्टात दिवाणी कि. अर्ज नं.१३७/२०२४ चा जन्म बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८७२ कलम २ प्रमाणे वारस दाखलासाठी अर्ज केला आहे. अर्जदार नं.१ चा मुलगा मयत कै.पंकज सुरेश मोरे, हे सुभाष कॉलनी, शिरपूर ता.शिरपूर, येथे दि. १४/१/२०२४ रोजी अल्पशा आजाराने व ह्रदविकाराने मयत झाले आहेत. अर्जदार नं.१ चा मुलगा हे शिरपूर, ता.शिरपूर येथे राहत असल्याने त्याचा वारस दाखला हा शैक्षणिक कामासाठी तसेच शासकीय व निमशासकीय योजनांसाठी लाभासाठी गरजेचा होता. अर्जदार नं.१ ते ३ यांचे नावे लावणे कामी वारस दाखल्यासाठी अर्जदार नं.१ ते ३ यांनी सदरचा अर्ज केला आहे.

याकामी कोणाचेही कोणतीही कायदेशीर तक्रार असल्यास मे.न्यायालयात दिनांक २१/०३/२०२४ रोजी सकाळी ठिक. १०.३० वा. स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून हरकत नोंदवावी. तसे न केल्यास मे.न्यायालयास योग्य तो पुढील आदेश करावा लागेल. याची नोंद घ्यावी.

स्थळ– शिरपूर, दिनांक– /२/२०२४

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्याया. क.स्तर, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक** दिवाणी न्याया. क.स्तर, शिरपूर

## जाहीर नोटीस

**मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो., शिरपूर यांचे न्यायालयात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२४

श्री.जयराम सुगनालाल पंजवाणी,
रा.जुने वाघाडी रोड, जनता नगर, शिरपूर,
ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

म.मुख्याधिकारी सो.,
शिरपूर वरवाडे नगर परिषद, शिरपूर,
ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात अर्जदार जयराम सुगनालाल पंजवाणी याचा जन्म दिनांक ०८/०७/१९८६ रोजी मौजे शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे येथे जन्म झाले बाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दिनांक / /२०२४ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती वरून व अधिकार वरून आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

शिरपूर, दि.२३/०२/२०२४

**अॅड.संजय दिनानाथ सानफ**
कॉलेज रोड, कोर्टाच्या गेट समोर, शिरपूर, जि.धुळे. पिन–४२५४०५





# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी...

- महाराष्ट्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू. मातृभाषेतून शिक्षणावर भर.
- नॅक मूल्यांकन व मानांकन प्रक्रियेत महाराष्ट्र अव्वल स्थानावर.
- राज्यात ९ ठिकाणी नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये. ४,३६५ कोटी रुपये खर्चास मंजूरी.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय नर्सिंग मध्ये ५ हजार १८२ पदे भरती प्रक्रिया पूर्ण.
- 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात एक लाखांहून अधिक शाळांमधील दोन कोटी विद्यार्थ्यांचा सहभाग. अभियानातील तीन उपक्रमांची दखल घेऊन 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करणार. मोठ्या बांधकामांसाठी निधी.
- नामांकित शिक्षण संस्थांना विशेष अनुदान देण्यासाठी २०२३–२४ या वर्षात ५०० कोटींचा निधी.
- मुंबईत भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू.
- शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ.
- सर जे.जे. कला आणि वास्तुशास्त्र महाविद्यालयाला अभिमत विद्यापीठाचा दर्जा.
- अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय.
- राज्यात जळगांव, लातूर, बारामती, मिरज, नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (नर्सिंग) महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय.
- शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इ. पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना शासनामार्फत एकसमान दोन गणवेश, एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजे यांचा लाभ.
- उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा योजनेतील शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये भरीव वाढ.
- पुस्तकांमध्ये सरावासाठी कोरी पाने देऊन विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी.
- प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात अंडी आणि केळीचा समावेश. तृणधान्यांबाबतही जागरुकता निर्माण करणार.
- अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती योजना लागू.
- तृतीयपंथी विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क माफीचा निर्णय.
- 'पवित्र प्रणाली'द्वारे शिक्षक पद भरतीस सुरुवात.
- त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदानाचा पुढील टप्पा देण्याचा निर्णय. सुमारे ११६० कोटी रुपये इतका वार्षिक खर्च अपेक्षित.
- प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गातील शिक्षण सेवकांना सहा ऐवजी १६ हजार रुपये, माध्यमिकसाठी आठ ऐवजी १८ हजार रुपये तर उच्च माध्यमिकसाठी नऊ ऐवजी २० हजार रुपये सुधारित भरघोस मानधन.
- अर्धवेळ ग्रंथपालांचे उन्नयन करुन ग्रंथपालांना १४ हजार रुपये, प्रयोगशाळा सहायकांना १२ हजार रुपये तर कनिष्ठ लिपिकांना १० हजार रुपये सुधारित मानधन.



# विकसित भारत विकसित महाराष्ट्र!

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR



# इर्शादभाई जहागीरदार यांच्याकडून बोअरवेल्सचे उद्घाटन

**धुळे, दि.९- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या ५० बोरवेल पैकी १३ व १४ क्रमांकाची बोरवेल शहरातील देवपूर प्रभाग क्रमांक २ सदुरु कॉलनी मधील ओपन स्पेस व न्यू एकता हाऊसिंग सोसायटी सोमेश्वर महादेव मंदिर येथे लोकार्पण सोहळा संपन्न झाला.**

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागिरदार, शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी, कार्याध्यक्ष जावेद बिल्डर, रवींद्र आघाव, उपाध्यक्ष राजेंद्र चित्तोडकर, सामाजिक न्याय प्रदेश सरचिटणीस महेंद्र शिरसाट, माजी नगरसेवक उमेश महाले, प्रदेश उपाध्यक्ष अल्पसंख्यांक सेल रईस काजी, शहराध्यक्ष अल्पसंख्याक विभाग माजिद अन्सारी, शहर सरचिटणीस संजय जगताप, सरचिटणीस संजय अहिरे, गणेश जाधव, दिव्यांग सेल शहराध्यक्ष एजाज शेख, संतोष केदार, महेश भामरे, ज्ञानेश्वर पाटील, आरिफ खाटीक, अफसर शेख, सनी आघाव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# सामाजिक न्याय विभागातर्फे नऊ व्यक्ती व एका संस्थेची पुरस्कारासाठी निवड

**धुळे, दि.९- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने समाज कल्याण क्षेत्रांत कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक, व्यक्तींना दर वर्षी विविध पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. त्यात धुळे जिल्ह्यातील नऊ व्यक्ती व एका संस्थेचा समावेश आहे.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या विविध पुरस्कारांची शासनाने घोषणा केली आहे. पुरस्काराचे वितरण सोहळा दि.१२ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस जमशेद भाभा नाट्यगृह, एनसीपीए मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई येथे होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबईचे पालकमंत्री व मुंबई उपनगरचे पालकमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. पुरस्कारार्थींचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, समाजकल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, नाशिक विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ व सहा. आयुक्त समाज कल्याण धुळे संदरसिंग वसावे यांनी अभिनंदन केले.

**पुरस्कारार्थी व्यक्ती व संस्था**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार- शशिकांत राजाराम वाघ, कैलास आधार चौधरी, जोसेफ लॉरेन्स मलबारी, सुरेश सोनराज पारख, राजेंद्र नामदेव जिरेकर, मोहन चिंतामण मोरे, भिवसन रामदास अहिरे व मुक्ता आदिवासी महिला बहुउद्देशीय संस्था, धुळे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार- रामदास चिंधू जगताप, यशवंत दोधू कांबळे.

# एस.ए.मिशन स्कुल येथे शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण संपन्न

**शहादा, दि.९ (प्रतिनिधी)- आगामी काळात लागू होणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांच्या ज्ञानात वृद्धी व्हावी व तो अधिक सक्षम होऊन विद्यार्थ्याला घडवण्यासाठी सज्ज व्हावा या दृष्टीने शिक्षण विभागातर्फे राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना क्षमता वृद्धी प्रशिक्षण दिले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुका स्तरावर दोन टप्प्यात इयत्ता नववी व दहावीच्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांना एस.ए.मिशन स्कूल शहादा येथे प्रशिक्षण दिले गेले.**

सुलभक आय.एस.मोरे शिरुड दिगर, प.पू.सती गोदावरी हायस्कूलच्या संगीता जयस्वाल, एम.जी राजपूत, श्री.ठाकरे सर, शेठ व्ही.के.शहा विद्यालय डी. आर.पाटीा, भामरे हायस्कूल चव्हाण, पवार, योगीता मॅडम, शरद पटेल यांनी खेळीमेळीच्या वातावरणात प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणार्थींनी मनोगत व्यक्त करून अशा प्रकारचे प्रशिक्षण हे नियमित प्रमाणे आयोजित करून विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी सामोरे जाणाऱ्या शिक्षकांना नियमितपणे देण्यात यावे याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केल्या. समारोपप्रसंगी गटशिक्षणाधिकारी योगेश साळवे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या प्रसंगी गटसाधन केंद्राचे समन्वयक मोरे उपस्थित होते.

# ग्रामनिधीचा अपहार तिघांविरोधात गुन्हा

**धुळे, दि.९- धुळे तालुक्यातील नेर येथे घरपट्टी, पाणीपट्टीची साडे सात कोटींहुन अधिक रकमेचा अपहार झाला आहे. ग्रामस्थांकडून परस्पर वसुली करणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

ग्रामविकास अधिकारी सुनिल भास्करराव देसले यांनी दि.७ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, नेर गावातील हर्षल भगवान मोरे, संजय लाला वाघ व राकेश श्रीराम जाधव या तिघांनी संगनमताने २०१५ ते २०२० या कालावधीत संगनमताने घरपट्टी व पाणीपट्टी करवसुली करून ग्रामनिधी व पाणीपुरवठा बँक खात्यात नियमित जमा करणे आवश्यक आहे. परंतू तिघांनीही बनावट घरपट्टी, पाणीपट्टी पावती पुस्तकाद्वारे एकूण सात लाख चोपन्न हजार तीनशे तेहतीस रूपयांची वसुली करून ग्रामनिधीचा अपहार केला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

धुळे, दि.९- शहरातील प्रमुख रस्ते आणि विशेषत: कॉलनी परिसरात भटक्या कुत्र्यांनी दहशत माजविली असून या भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. मनपा प्रशासकांनी याप्रश्नी गांभीर्य घ्यावे. दररोज कुत्रा चावल्याच्या घटना वाढल्या आहेत, अशा तक्रारी नागरिक करीत आहेत.

पान १ वरुन

## महापालिकेची एकही जागा..

भाजपाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना खा.डॉ.भामरे म्हणाले की, महापालिकेच्या मोकळ्या जागांवर भुमाफियांची नजर आहे. चांगल्या कामासाठी आपण नेहमीच सोबत असतो. हिरे वैदकीय महाविद्यालयाची पंचवीस एकरची जागा आहे. परंतू भुमाफियांनी बावीस एकर शिल्लक ठेवली असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. मनपाच्या प्लॉट नं. १५३ च्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याचा ठराव मंजूर झाला. तेवीस हजार चौरस मिटर जागेत ४६० चौ.फुटांचे १६० गाळे या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. ईमारत उभारणीसाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या संकुलातील गाळे लिलाव पध्दतीने एकोणतीस वर्ष कराराने देण्यात येणार आहेत. यामुळे शहरातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होणार आहे. या संकुलासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शामसुंदर पाटील यांनी केले.

## संत संस्कृती रक्षा मूकमोर्चाचे आयोजन

महापालिका येथून झाशी राणी चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत काढण्यात येणार आहे. मूक मोर्चास साधक बांधव व संत-संस्कृती रक्षक प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री योग वेदांत सेवा समितीचे लोहार, प्रविण रेलन यांनी केले आहे.

पान १ वरुन

## मराठा बांधवांची विराट सभा

आहे. एकजूट फुटू द्यायची नाही. सगेसोयऱ्यांबाबत सरकारची काही दिवस वाट बघू. मराठ्यांना आरक्षणाची गरज नाही, असे फडणवीसांना वाटते. आपण दिलेल्या १० टक्के आरक्षणामुळे मराठा खुश आहे, असे त्यांना वाटते. मराठ्यांनी ओबीसीतून आरक्षण मागितले पण तुम्ही १० टक्के दिले. यामुळे मराठ्यांनी गुलाल उधळला नाही. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी केली असती तर तुमच्या अंगावरचा गुलाल १५ दिवस निघाला नसता, असे जरांगे म्हणाले.

**जरांगेंना सरकारी सुरक्षा**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सरकारला वेठीस धरणारे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आता सरकारी सुरक्षा मिळणार आहे. राज्याच्या गृह विभागाकडून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटलांच्या अवती भोवती २४ तास पोलीस असणार आहेत. दोन सशस्त्र पोलीस कॉन्स्टेबल त्यांच्यासोबत असतील अशी माहिती देण्यात आली आहे. मनोज जरांगेंना सुरक्षा पुरवावी अशी मागणी मराठा समाजाकडून करण्यात आली होती. राज्य गुप्तवार्ता विभागाच्या आदेशानंतर जरांगे पोलीस सुरक्षा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## बचत गटाच्या मध्यमातून आपल्या गावात..

तद्अनुषंगिक साहित्य वितरित केले जात आहे. आदिवासी भागातील नागरिकांच्या समृद्धीसाठी जे उपक्रम व योजना राबवता येतील ते उपक्रम व योजना राबवण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. ते पुढे म्हणाले, प्रत्येक वाडा-पाड्याला जोडणारे जाडरस्ते बिरसा मुंडा योजनेच्या माध्यमातून जोडले जाणार आहेत. आश्रमशाळा, आरोग्य केंद्र, शाळा, ग्रामपंचायतींना या रस्त्यांच्या माध्यमातून जोडले जाणार आहे. जलजीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक घरात नळाच्या माध्यमातून पेयजल दिले जाणार असून आता शासकीय योजना जनतेच्या गरजेप्रमाणे राबवली जाणार आहे, त्यासाठी तुम्ही एखादा स्थानिक पातळीवर शेतीपुरक उद्योग विवडायचा आहे त्या उद्योगाला प्रोत्साहन आणि बाजारपेठ मिळवून देण्याचाही प्रयतव येणाऱ्या काळात शासनानार्फत केला जाणार आहे. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ.सुपिया गावित, खासदार डॉ. हिना गावित यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## धुळे जिल्ह्यात भारत जोडो न्याय..

मार्गदर्शन केले. बैठकिला ज्येष्ठ नेते एन.सी.पाटील, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस युवराज करनकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेश पाटील, जोसेफ मलबारी, शिरपूर तालुका काँग्रेस अध्यक्ष मनोहर पाटील, ज्येष्ठ नेते व्ही.यु.पाटील, उत्तमराव देसले, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, संचालक गुलाबराव कोतेकर, साहेबराव खैरनार, माजी पं.स.सभापती भगवान गर्दे, धुळे तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे, डॉ.एस.टी.पाटील, उपसभापती योगेश पाटील, पंढरीनाथ पाटील, एन.डी.पाटील, ऋषीकेश ठाकरे, दुध संघाचे चेअरमन वंसत पाटील, विजय देवरे, बाजार समितीचे संचालक विशाल सैंदाणे, कुणाल पाटील, ज्येष्ठ नेते महेश घुगे, सेवा दलाचे अध्यक्ष अलोक रघुवंशी, राजेंद्र भदाणे, जितेंद्र भदाणे, किरण जोंधळे, सादीक शेख, विनोद बच्छाव, रवि चौधरी, नगरसेवक शब्बीर पिंजारी, इम्तियाज पठाण, बापू खैरनार, अरुण पाटील, डॉ. दत्तात्रय परदेशी, विलासराव पाटील,रविंद्र चौधरी, राजेंद्र खैरनार, जगन्नाथ बैसाणे, सोमनाथ पाटील, हिरामण पाटील, राजीव पाटील, गणेश गर्दे, हर्षल साळुंके, हरीष पाटील, पंकज चव्हाण, किरण नगराळे, आनंदा पाटील, एकनाथ पाटील, संदिप पाटील, अर्चना पाटील, बानुबाई शिरसाठ, हसण पठाण, नाविद शेख, माज मुअ-ाजाम, अरबाज शेख, भिवसन अहिरे, हरिभाऊ चौधरी, भोलेनाथ पाटील आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन धुळे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे यांनी केले तर आभार प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस युवराज करनकाळ यांनी मानले.

## जैन मंदिराची दानपेटी फोडणाऱ्या..

राबवून गोपा ऊर्फ गोलु रतन पाटील (वय १९) बाळापूर भगवा चौक, ता.जि. धुळे, अमित सुभाष घोडेस्वार (वय ३१)बाळापूर फागणे, बोरसे नगर,ता.जि.धुळे, समाधान दत्तात्रय पाटील (वय २३) रा.सुभाष नगर नवा प्लॉट दत्त मंदिर चौक ता.जि.धुळे यांनी चोरी केल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. आरोपींना बाळापूर फागणे येथून एलसीबीच्या पथकाने ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबूली दिली. त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेले पस्तीस हजार रूपये रोख, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी क्र.एमएच १२/एफजी- १४७२ असा एकूण एक लाख पाच हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच गोपाल ऊर्फ गोलु रतन पाटील याची अधिक विचारपूस केली असता त्याने देवपूर पोलीस स्टेशन परिसरात केलेल्या गुन्ह्याचीही कबूली देवून चोरी केलेली तीन हजार पाचशे रूपयांची रक्कम काढून दिली. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे दत्तात्रय शिंदे, सपोनि. श्रीकृष्ण पारधी, असई.संजय पाटील, पोहेकॉ. सुरेश भालेराव, पोना.रविकिरण राठोड, पोकॉ.सुशिल शेंडे, गुणवंत पाटील, निलेश पोतदार, हर्षल चौधरी, अमोल जाधव यांनी केली.

## दोन्ही चोरट्यांना केले गजाआड

गेलेली सहा हजार चारशे पन्नास एवढी रक्कम राजेश पाटील कडून हस्तगत करण्यात आली. गोपाल पाटील याला ताब्यात घेवून गुन्ह्यातील चोरीस गेलेली तीन हजार पाचशे रक्कम अशी एकूण नऊ हजार नऊशे पन्नास रूपयांची रोख रक्कम हस्तगत केली. गोपाल ऊर्फ गोलू रतन पाटील याचेवर यापूर्वी देखील सोनगीर, धुळे तालुका, निजामपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि.दत्तात्रय शिंदे, पोसई.बाळासाहेब सुर्यवंशी, अमरजित मोरे, योगेश राऊत, असई.संजय पाटील, पोहेकॉ.मुकेश वाघ, पंकज खैरमोडे, प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, संतोष हिरे, पोना.शशिकांत देवरे, देवेंद्र ठाकूर, पोकॉ.हर्षल चौधरी, जितेंद्र वाघ, अमोल जाधव,महेंद्र सपकाळ, जगदीश सुर्यवंशी यांनी केली.

## गावठाण फिटर कामाचे भूमिपूजन

विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे सांगितले. कार्यक्रमाला आ.पावरा, पप्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल, जि.प.सभापती कैलास पावरा, जि.प.सदस्य योगेश बादल, जि.प.सदस्य सुक्राम पावरा, सुभाष कुलकर्णी, म.रा.वि.महा मंडळाचे कनिष्ठ अभियंता चेतन पाटील, संजय चौधरी, तलाठी गुरुदास सोनवणे, सरपंच सरलाबाई धनगर, उपसरपंच रुपाली कोळी, माजी उपसरपंच लोटन कोळी, सदस्य अनिता कोळी, दुर्गाबाई मोरे, सुनील मोरे, उखडू कोळी, नुरसिंग पावरा, राजेंद्र धनगर, ग्रामसेवक गोरख सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग धनगर, राहुल ईशी, सुनील कोळी, मधुकर मंगळे, संतोष वंजारी, भटू कोळी, प्रकाश धनगर, महेंद्र वंजारी, पुंजू कोळी, मच्छिंद्र कोळी, राजाराम कोळी, सुधीर कोळी, सुरेश मोरे, ओंकार पावरा, रुपसिंग पावरा, कैलास पावरा, रोहिदास पावरा, रामा भिल, कैलास मोरे, विजय चित्ते, धिरज कोळी, कुलदिप ईशी, सागर कोळी, बबलू कोळी, योगेश कोळी तसेच असली, तांडे, धनपूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी उपसरपंच लोटन कोळी यांनी सिंगल फेज लाईट काम मंजूर करून दिल्याबद्दल माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, आ.काशिराम पावरा, भूपेशभाई पटेल, म.रा.वि.वितरण महामंडळाचे ग्रामस्थांच्या वतीने विशेष आभार मानले.

## महाशिवरात्री निमित्त लोटला जनसागर

पायी प्रदर्शन घालतात. तोरणमाळ यात्रेत परिसरातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने येत असल्याने याठिकाणी आदिवासी संस्कृतीचे प्रतिक असलेले साहित्य खरेदी करतात. तसेच याठिकाणी आयुर्वेदिक औषधींची दुकाने मोठ्या प्रमाणात लावण्यात आले होते. या यात्रेत मोठ्या प्रमाणात भाविक येतात. त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून अनेक स्वंयसेवक स्वतःहून सेवेसाठी स्वइच्छेने श्रमदान करतात. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल चे संजय पाटील, भरत पटेल, धिरूभाई पटेल, गुड्डू पवार, अनिल चौधरी, ईश्वर पटेल, प्रशांत पाटील, रामचंद्र चौधरी, वकील पाटील यांनी सालाबादप्रमाणे भंडाऱ्याचे आयोजन केले होते.

२० वर्षापासून ग्राहकांचा विश्वास असणारे
श्री लॅण्ड डेव्हलपर्स घेऊन येत आहे..
भक्ती नगर
मासिक सुलभ हप्त्याने प्लॉट विक्री योजना
* योजनेची ठळक वैशिष्ट्ये *
* सदर प्लॉटस्‌ची योजना ही मुंबई आग्रा हायवेपासून अवघ्या २०० मिटर अंतराच्या आत धुळे एम.आय.डी.सी.समोर रानमळा रस्ता टच.
* प्लॉटची साईज : १२ X ६५ व ११ X ६५ व त्यापेक्षा मोठी साईज उपलब्ध.
* सदर योजनेची प्रवेश फी रु.५००/- असेल.
* एन.ए. व सनद झालेले प्लॉटस्.
* रोखीने व हप्त्याने खरेदीची सोय.
* वास्तुशास्त्राप्रमाणे डी मार्केटींग केलेले प्लॉटस्
* निसर्गरम्य वातावरणातील साईट.
* सर्वसामान्यांसाठी आपल्या बजेटमध्ये आपल्या पाल्यांसाठी चांगल्या गुंतवणुकीचा पर्याय.त्वरा करा!
-: संपर्क :-
श्री.सुभाष भगवान लोकरे श्री.स्वप्निल सुभाष लोकरे
ऑफिस :- २७०९, ग.नं.५, घड्याळवाली मस्जिद जवळ, धुळे
9011765188, 9823412718, (02562) 240109

पाहिजेत
मेडीकल होलसेल दुकानामध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकाऊंटंट
२) सेल्समन-बाहेरगावसाठी
३) मदतनिस - हेल्पर
संजय मेडीकल्स
नवग्रही, धुळे

पाहिजेत
दुकान कामाकरिता व माल वाटपाकरिता मुले पाहिजेत. समक्ष भेटावे!
पूर्वा एजन्सीज
बॉम्बे लॉजमागे, ग.नं.३, गजानन टी समोर, धुळे

पाहिजे
Co2 वेल्डर - ४
सेल्स मॅनेजर - १
शिक्षण (B.E. Civil, Diploma)
हेल्पर - २
अनुभव असल्यास प्राधान्य
9823261545

पाहिजेत
१) फार्मासिस्ट (औषध निर्माता)- २ किमान २ वर्षाचा अनुभव
२) हेल्पर पाहिजेत.
मेडीकल दुकानात अनुभवी मुले पाहिजेत - ४
-: संपर्क :-
चंद्रकांत रामदास सुर्यवंशी (मालक)
छत्रपती मेडीकल्स, १/२, कांकरिया टॉवर, सिव्हील हॉस्पीटल समोर, साक्रीरोड, धुळे

जागा भाड्याने देणे आहे
कुरीयर कंपनी, फायनान्स बैंकस्, मिनी ब्रांच शोरूम, Smart Store
ग्राऊंड फ्लोअर २५०० स्क्वे.फुट,
फर्स्ट फ्लोअर ३००० स्क्वे.फुट,
पत्ता- ४० गांवरोड चौ.फुली जवळ धुळे.
-: संपर्क :-
९४२१४६३०६४

बंगला विकणे/भाड्याने देणे
हॉस्पीटल/होस्टेल/ऑफिस/ क्लासेस/ फायनान्शिअल एजन्सीज/मोठा संयुक्त परिवार याकरिता उपयुक्त असा १२ खोल्यांचा प्रशस्त दुमजली बंगला योग्य किंमत आल्यास विकणे अथवा भाड्याने देणे आहे. एसएसव्हीपीएस इंजिनिअरींग कॉलेज मागे, प्रभात नगर, देवपूर, धुळे
9260719780
9860338203

श्री नेत्रालय हॉस्पिटल नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
* कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
* फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
* तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ८४४६५१७६६३

नेर येथे प्लॉट विकणे
नेर ता.जि.धुळे येथे बा.जी.नगर मधील प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9766611456

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony | USHA
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
56 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

शेती विकणे आहे
साक्री शिवारातील गट-२१५/१ ०.९८ आर क्षेत्र शेती योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
९४२२२१३९७७

प्लॉट विकणे आहे
वैभवनगर प्राईम लोकेशनवर 30x85 स्क्वे.फूट पश्चिम मुखी प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9271559573

विकणे आहे
Activa - 2008
उत्तम कंडीशन
अपेक्षित किंमत- रु.३१०००/-
-: संपर्क :-
9423390451

पाहिजे
कापड दुकानासाठी अनुभवी हेल्पर पाहिजे. समक्ष भेटा
रमेशचंद्र जोगराज बडेरे
ग.नं.२, नवग्रही, धुळे
7378992222

घर विकणे आहे
व्ही.डब्ल्यु.एस. कॉलेज मागे जैन मंदिरा जवळ डी.पी.रोडला लागून अजबे नगर सि.सर्वे नं.४४३२ येथील पहिल्या मजल्या वरील एकूण ६ रूमचे नवीन आर.सी.सी. बांधकाम असलेले सर्व सोयीयुक्त राहते घर योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क :- ९९२३२५२४७०

पाहिजे
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे.
सेल्समन - २
हेल्पर - २
वय २० ते ३० वर्ष
श्याम वॉच एण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
9960777594
7219036785

पाहिजेत
मार्केटींग एक्झीक्युटीव्ह (मुलगा) पदवीधर
बॅक ऑफीस/रिसेप्शनिस्ट (मुलगी) पदवीधर /कॉम्प्युटर स्किल
सर्व्हिस इंजिनिअर (मुलगा) पदवीधर/फ्रेशर
पगार - ८००० ते १२००० पर्यंत
संपर्क : शॉप नं. ५१७, श्रीराम शॉपिंग कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे
मो. 9923196444, 9422770066

प्लॉट विकणे आहे
माहेश्वरी सोसायटी सर्व्हे नं.९१, प्लॉट नं.२४, साईबाबा मंगल कार्यालयाचे पुढे, नकाणेरोड, देवपूर, धुळे. प्लॉट-८५० स्क्वे.फुट योग्य भाव मिळाल्यास त्वरित विकणे आहे.
संपर्क : रमेश साळवे
7066559455

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०